म. ग्रं. सं. ठाणे
विषय भाषाव्याकरण
सं. क्र.

सुबोध
भाषाव्या[illegible]

५

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळ
ग्रंथांक.............................. दि: ...............
विभाग .............. नोंद दि: ..........
अनु ३८

लहान मुलांकरितां

# सुबोध व्याकरण.

---

रामचंद्र भिकाजी गुंजीकर,

'एल्फिन्स्टन् हाय्स्कूल्' विद्यालयांतील शिक्षक

यानें केलें.

तें

मुंबईंत

'जॉइन्ट्स्टॉक् प्रिंटिंग्प्रेस्' छापखान्यांत छापिलें.

शके १८०८, इसवीसन १८८६.

---

सन १८६७ च्या २५ व्या आक्टाप्रमाणें नोंदून कर्त्यानें आपले सर्व हक्क ठेविले आहेत.

---

किंमत चार आणे.

## प्रस्तावना.

या पुस्तकांत लहान मुलांना आवश्यक तितके र्व विषय आणिले आहेत. तरी निरुपयोगी संज्ञा ाणि अप्रयोजक नियम मुळींच दिले नाहींत. ब्दांचे भेद आणि उपभेद हे कारणापुरतेंच सांगितले ाहेत. आवश्यक संज्ञा आणि त्यांचीं लक्षणें हान मुलांना समजतील अशीं सरळ आणि ोडक्यांत दिलीं आहेत. पुस्तकाची भाषा अत्यंत ुगम योजिली आहे. विभक्तींचें आणि क्रिया- ददांचें जाळ उकलून त्यांतील गुंतागुंत समूळ का- ून टाकली आहे. वाक्ययोजनेचे नियम स्पष्ट ेले आहेत; आणि मराठीभाषेंत येणाऱ्या ित्येक प्रयोगांची नीट व्यवस्था लावतां येत ाहीं अशी जो हाकाटी होती, ती दूर करण्याचा होईल तितका प्रयत्न केला आहे. आणि पुस्तकाचें अक्षर ठळक योजलें आहे.

लहान मुलांना, विनाकारण त्रास न व्हा
ह्मणून, संधिप्रकरण हें अगदीं शेवटीं समासप्रकरण
च्या जवळ दिलें आहे. द्वितीया आणि चतु
यांतील काल्पनिक भेद सोडून देऊन त्यां
वेगवेगळे प्रत्यय दिले आहेत. तसेंच कर्त
रि, कर्मणि, भावी किंवा भावे, आणि प्रयो
या विलक्षण संज्ञा न योजतां, त्यांच्या स्थळ
कर्त्याचें, कर्माचें, आणि क्रियेचें प्राधान्य
इत्यादि संज्ञा दिल्या आहेत. 'आख्यात
हा एक फार उपयोगी शब्द प्रचारांत आणल
आहे. तसेंच उत्तम, मध्यम, अन्य, पुरुष, य
प्राचीन रीतीला मिळत्या संज्ञा यांत योजिल्य
आहेत. याविषयीं कोणीही विचारी जन मल
दूषण देणार नाहींत, अशी आशा धरितों.

हें पुस्तक जितकें व्हावें, तितकें चांगलें झालें नसेल
हें उघड आहे. तथापि लहान मुलांना व्याकर
णाचा अभ्यास करतांना, जर यापासून पूर्वींच्या
पुस्तकांपेक्षां कांहीं तरी अधिक उपयोग झाला, त
माझे श्रम व्यर्थ गेले नाहींत, असें मी समजेन.

# सुबोध व्याकरण.

अ इ उ ऋ ऌ
आ ई ऊ ॠ ॡ
ए ऐ ओ औ
क् ख् ग् घ् ङ्
च् छ् ज् झ् ञ्
ट् ठ् ड् ढ् ण्
त् थ् द् ध् न्
प् फ् ब् भ् म्
य् र् ल् व्
श् ष् स् ह् ळ्
ं (अनुस्वार) : (विसर्ग)

ांना वर्ण ह्मणतात. वर्ण ह्मणजे भाषेंतील
ी साधे ध्वनि.
र्णांचे भेद चार,—स्वर, व्यंजनें, अनुस्वार,
 विसर्ग.

## स्वर.

स्वर ह्मणजे नुसते सूर. अ पासून औ पर्यंत स्वर. ते चौदा आहेत. स्वरांचे भेद दोन, ऱ्हस्व आणि दीर्घ.

ऱ्हस्व ह्मणजे तोकडा. दीर्घ ह्मणजे लांब.

अ इ उ ऋ ऌ–हे ऱ्हस्वस्वर.

आ ई ऊ ॠ ॡ–हे दीर्घस्वर.

ए ऐ ओ औ–हे ही दीर्घस्वर. यांनाच संधिस्वर ह्मणतात.

## व्यंजनें.

व्यंजनें ह्मणजे स्वरांच्या आश्रयानें राहणारे भरतीचे वर्ण. क् पासून ळ् पर्यंत व्यंजनें. तीं चौतीसआहेत.

नुसता स्वर, अथवा व्यंजनाशीं युक्त स्वर, याला अक्षर ह्मणतात.

क् या व्यंजनाला अ जोडला असतां क असें अक्षर होतें. व्यंजनांखालचा फांटा काढून टाकला ह्मणजे, त्याला 'अ' जोडला आहे, असें समजावें.

क् याला

आ ..... जोडला असतां ..... का
इ ............................ कि
ई ............................ की
उ ............................ कु
ऊ ............................ कू
ऋ ............................ कृ
ॠ ............................ कॄ
ऌ ............................ कॢ
ॡ ............................ कॣ
ए ............................ के
ऐ ............................ कै
ओ ............................ को
औ ............................ कौ

कोणत्याही अक्षराला अनुस्वार विसर्ग जोडतां येतात. जसें,— अं, किं, अः, छिः.

जो वर्ण उच्चारण्याला नाकाचें साहाय्य लागतें, तो अनुनासिक. जसें—आँ, ऊँ, एँ, काँ, इत्यादि. लिहितांना बहुशः अनुनासिक दाखविण्याला ं अनुस्वारच लिहितात. पण त्यांतील भेद नीट ध्यानांत ठेवावा. ङ् ञ् ण् न् म् हीं व्यंजनेंही अनुनासिक आहेत.

## जोडाक्षरें.

दोन किंवा अधिक व्यंजनें एकत्र आलीं, तर त्यांना संयोग ह्मणतात. जसें क् ट् मिळून क्ट् इत्यादि. संयोगापुढें स्वर आला, तर त्या सर्वाला मिळून संयुक्ताक्षर अथवा जोडाक्षर ह्मणतात. जसें,—

क् ट् अ मिळून क्ट

श् र् ई………………श्री

क् ष् अ………………क्ष

ज् ञ् अ………………ज्ञ

स् त् र् ई………………स्त्री

**भाववाचक नाम** ह्मणजे पदार्थाच्या गुणाचें अथवा धर्माचें नांव. जसें,—मनुष्यपणा, सौंदर्य, इ०.

**क्रियावाचकनाम** ह्मणजे कांहीं व्यापाराचें नांव. जसें,—जाणें, बसणें, येणें, इ०.

**सर्वनाम** ह्मणजे कोणत्याही नामाच्या स्थळीं योजतां येणारें नांव. जसें,—मी, तूं, तो, इ०.

## लिंगविचार.

हें नांव पुरुषाचें, आणि हें नांव स्त्रीचें, असा जो भेद तें लिंग.

लिंगें तीन आहेत,—**पुल्लिंग**, **स्त्रीलिंग**, आणि **नपुंसकलिंग**.

पुरुषाचें, अथवा पुरुषाप्रमाणें मानलेल्या वस्तूचें नांव तें **पुल्लिंग**. जसें,—राजा, मुलगा, समुद्र, पर्वत, इ०.

स्त्रीचें, अथवा स्त्रीप्रमाणें मानलेल्या वस्तूचें नांव तें **स्त्रीलिंग**. जसें,—राणी, मुलगी, नदी, टेकडी, इ०.

जें नांव पुल्लिंगही नव्हे, आणि स्त्रीलिंगही नव्हे, तें नपुंसकलिंग. जसें,—झाड, पाणी, तळें, इत्यादि.

स्त्री किंवा पुरुष हा भेद ध्यानांत न आणतां, योजलेलें जें नांव, तेंही नपुंसकलिंग. जसें,—मूल, कुत्रें, घोडें, इ०.

लिंगभेद स्पष्ट करण्याकरितां, पुल्लिंग नामाच्या पूर्वी 'तो', स्त्रीलिंग नामाच्या पूर्वी 'ती', आणि नपुंसक नामाच्या पूर्वी 'तें', हे शब्द लावितात. जसें—तो समुद्र, ती नदी, तें पाणी, इ०.

## निर्जीव पदार्थांच्या नांवांचा लिंगभेद.

१ अंगरखा, सोटा, वाडा, इत्यादि आकारांत शब्द पुल्लिंग.

२ पागा, हत्रा, मजा, रजा, सजा, हे शब्द स्त्रीलिंग.

३ आज्ञा, विद्या, प्रभा, ममता, इत्यादि संस्कृतशब्द स्त्रीलिंग.

४ आत्मा, प्रेमा, महिमा, गरिमा, हे पुल्लिंग.

५ नदी, वेणी, काठी, छत्री, बढाई, मर्जी, इत्यादि ईकारांत शब्द स्त्रीलिंग.

६ गति, मति, स्तुति, रीति, भीति, बुद्धि, वृद्धि, इत्यादि स्त्रीलिंग.

७ कर्मणूक, वागणूक, जेवणावळ, पत्रावळ, इत्यादि स्त्रीलिंग.

८ तळमळ, कळमळ, कटकट, पळापळ, आरडाओरड, इत्यादि स्त्रीलिंग.

९ चकचकाट, खणखणाट, सणसणाट, इत्यादि पुल्लिंग.

१० गुरुत्व, महत्व, देवपण, लाघव, गौरव, इत्यादि नपुंसकलिंग.

११ दहीं, दूध, पाणी, लोणी, तेल, तूप, हे नपुंसकलिंग.

## क्षुद्र जंतूंच्या नांवांचा लिंगभेद.

१२ मासा, नाकतोडा, विंचू, काडू, नारू, साप, मगर, इत्यादि पुल्लिंग.

१३ माशी, मुंगी, पाल, घोरपड, सुसर, घोण, ऊ, पिसू, जळू, इत्यादि स्त्रीलिंग.

१४ चिलट, मुरकूट, पिंगाणें, घुंगुरटें, इत्यादि नपुंसकलिंग.

कित्येक शब्दांचें लिंग केवळ प्रचारावरून जाणावें. जसें,—तो पाऊस, ती वाट, तें घर, इत्यादि.

कित्येक पुल्लिंग नामांवरून अन्यलिंगी नामें भाणतां येतात. जसें,—

| पुल्लिंग. | स्त्रीलिंग. | नपुंसकलिंग. |
|---|---|---|
| घोडा | घोडी | घोडें |
| कुत्रा | कुत्री | कुत्रें |

| पु०. | स्त्री०. | पु०. | स्त्री०. |
|---|---|---|---|
| काका | कांकी | सिंह | सिंहीण, सिंही |
| मामा | मामी | धोबी | धोबीण |
| वाघ | वाघीण | भाट्या | भाटीण इ०. |

कित्येक पुल्लिंग नामांच्या जोडीचीं स्त्रीलिंग नामें वेगळींच असतात. जसें,—

| | | | |
|---|---|---|---|
| राजा | राणी | सासरा | सासू |
| नवरा | बायको, नवरी | बाप | आई |
| दीर | जाऊ | मोर | लांडोर इ०. |

## विभक्ति.

एका मूळशब्दापासून जीं अनेक पदें होतात

त्या विभक्ति. विभक्ति आठ आहेत. प्रथमा ह्मणजे पाहिली, द्वितीया ह्मणजे दुसरी, तृतीया ह्मणजे तिसरी, चतुर्थी ह्मणजे चौथी, पंचमी ह्मणजे पांचवी, षष्ठी ह्मणजे सहावी, सप्तमी ह्मणजे सातवी, आणि संबोधन ह्मणजे हाक मारण्याची.

एकवचन आणि अनेकवचन असे एकेका विभक्तीचे दोन दोन भेद आहेत.

एकवचन ह्मणजे एक वस्तु दाखविणारा शब्द, आणि अनेकवचन ह्मणजे दोन किंवा अधिक वस्तु दाखविणारा शब्द. जसें,—काठी हें एक-वचन, आणि काठ्या हें अनेकवचन.

शब्दाला कांहीं निमित्तानें अधिक अक्षर किंवा वर्ण लागतो, तो प्रत्यय.

## विभक्तींचे प्रत्यय.

| विभक्ति. | एकवचन. | अनेकवचन. |
|---|---|---|
| प्रथमा. | — | — |
| द्वितीया. | ला (स) | ना (ला, स) |

| | | |
|---|---|---|
| तृतीया. | नें | नीं (हीं) |
| चतुर्थी. | साठीं | साठीं |
| पंचमी. | हून (*तून) | हून (*तून) |
| षष्ठी. | चा | चा |
| सप्तमी. | *त | *त |
| संबोधन. | — | नो |

अनेकवचन प्रत्ययांपूर्वी शब्दाचा अंत्य स्वर अनुनासिक होतो.

विभक्तींचे वर्ग पांच आहेत.

## वर्ग पहिला.

### हत्ती शब्द.

| विभक्ति. | एकवचन. | अनेकवचन. |
|---|---|---|
| प्रथमा. | हत्ती | हत्ती |
| द्वितीया. | हत्तीला | हत्तींना |
| तृतीया. | हत्तीनें | हत्तींनीं |
| चतुर्थी. | हत्तीसाठीं | हत्तींसाठीं |
| पंचमी. | हत्तीहून | हत्तींहून |

| | | |
|---|---|---|
| षष्ठी. | हत्तीचा | हत्तींचा |
| सप्तमी. | हत्तींत | हत्तींत |
| संबोधन. | हत्ती | हत्तींनो |

याप्रमाणें काका, दादा, राघोबा, रावजी, दंडी, पांडू, काजू, पेरू, देवी, आबरू, टाहो, लाहो, खो, द, इत्यादिकांचीं रूपें जाणावीं. यांत प्रत्ययांच्या निमित्तानें शब्दाला कांहीं विकार होत नाहीं.

## वर्ग दुसरा.

### भिंत शब्द.

(यांत विभक्तिकार्य ई.)

| | | |
|---|---|---|
| प्र. | भिंत | भिंती |
| द्वि. | भिंतीला | भिंतींना |
| तृ. | भिंतीनें | भिंतींनीं |
| च. | भिंतीसाठीं | भिंतींसाठीं |
| पं. | भिंतीहून | भिंतींहून |
| ष. | भिंतीचा | भिंतींचा |

| | | |
|---|---|---|
| स. | भिंतींत | भिंतींत |
| सं. | भिंती | भिंतींनो |

याप्रमाणेंच रीत, गत, चाल, साल, इत्यादि बहुतेक अकारांत स्त्रीलिंग शब्दांचीं रूपें जाणावीं.

विभक्तिप्रत्ययांपूर्वीं शब्दाचें जें नेमकें रूप होतें, त्याला सामान्यरूप ह्मणतात. 'भित' याचें सामान्यरूप 'भिंती'. 'हत्ती' याचें सामान्यरूप 'हत्ती' हेंच. अनेकवचनीं सामान्यरूपाचा अंत्य स्वर अनुनासिक असतो. जसें—भिंतीं, हत्तीं, इ०.

## वर्ग तिसरा.

### साधु शब्द.

(यांत प्रत्ययांपूर्वीं दीर्घ.)

| | | |
|---|---|---|
| प्र. | साधु | साधु |
| द्वि. | साधूला | साधूंना इ०. |

याप्रमाणें गिरि, रुचि, दधि, गुरु, धेनु, मधु, इत्यादि ऱ्हस्व इकारांत उकारांत संस्कृत शब्दांचीं रूपें जाणावीं.

# वर्ग चौथा.

( यांत मुख्य कार्य आ. )

### १. रथ शब्द ( पुल्लिंग. )

| | | |
|---|---|---|
| प्र. | रथ | रथ |
| द्वि. | रथाला | रथांना इ०. |

याप्रमाणें वृक्ष, सूर्य, पर्वत, वाघ, इत्यादि पुल्लिंग शब्दांचीं रूपें जाणावीं.

परभू, वाटसरू, तट्टू, यात्रेकरू, इत्यादि कांहीं शब्दांचीं रूपें परभाला, परभूला; वाटसराला, वाटसरूला; इत्यादि दोन दोन प्रकारचीं होतात.

### २. घर शब्द ( नपुंसक. )

| | | |
|---|---|---|
| प्र. | घर | घरें |
| द्वि. | घराला | घरांना इ०. |

याप्रमाणें झाड, पान, लिंबूं, कुसूं, पांखरूं, तट्टूं, इत्यादि नपुंसक शब्दांचीं रूपें जाणावीं.

३. धार शब्द ( स्त्रीलिंग. )

| | |
|---|---|
| धार | धारा |
| धारेला | धारांना इ०. |

याप्रमाणें अटक, अडक, इत्यादि कित्येक अकारांत स्त्रीलिंग; आणि विद्या, गंगा, हवा, इत्यादि आकारांत स्त्रीलिंग शब्दांचीं रूपें जाणावीं.

## वर्ग पांचवा.

( मुख्य कार्य या किंवा वा )

या.

१. कोल्हा शब्द (पुल्लिंग.)

| | | |
|---|---|---|
| प्र. | कोल्हा | कोल्हे |
| द्वि. | कोल्ह्याला | कोल्ह्यांना इ०. |

याप्रमाणें आंबा, वाडा, घोडा, इत्यादि आकारांत पुल्लिंग शब्दांचीं रूपें जाणावीं.

२. धनी शब्द ( पुल्लिंग. )

| | | |
|---|---|---|
| प्र. | धनी | धनी |

| | | |
|---|---|---|
| द्वि. | धन्याला | धन्यांना इ०. |

याप्रमाणें शास्त्री, वाणी, तेली, इ०.

३. मोतीं शब्द ( नपुंसक. )

| | | |
|---|---|---|
| प्र. | मोतीं | मोत्यें, मोतीं |
| द्वि. | मोत्याला | मोत्यांना इ०. |

याप्रमाणें पाणी, लोणी, दहीं, इत्यादि. पण यांचीं अनेकवचनें व्यवहारांत येत नाहींत.

४. तळें शब्द ( नपुंसक. )

| | | |
|---|---|---|
| प्र. | तळें | तळीं. |
| द्वि. | तळ्याला | तळ्यांना इ०. |

याप्रमाणें कडें, पागोटें, घोडें, कुत्रें, इ०.

५. काठी शब्द ( स्त्रीलिंग. )

| | | |
|---|---|---|
| प्र. | काठी | काठ्या |
| द्वि. | काठीला | काठ्यांना इ०. |

याप्रमाणें नदी, सुपारी, वाटी, इ०.

वा.

१. गहूं शब्द ( पुल्लिंग. )

| | | |
|---|---|---|
| प्र. | गहूं | गहूं |

द्वि. गव्हाला गव्हांना इ०.

याप्रमाणें भाऊ (ह्मणजे बंधु या अर्थाचा) शब्द.

२. नातू शब्द ( पुल्लिंग. )

प्र. नातू नातू

द्वि. नातवाला नातवांना इ०.

लाडू, नारू, पणतू, विस्तू, साडू, विंचू, काडू, इत्यादिकांचीं रूपें लाडवाला, लाडूला ; नारवाला, नारूला; अशीं दोन दोन प्रकारचीं होतात.

३. तारूं शब्द ( नपुंसक. )

प्र. तारूं तारवें

द्वि. तारवाला तारवांना इ०.

याप्रमाणें गळूं, आसूं, कुंकूं, इत्यादि. 'कुंकू' शब्दाला अनेकवचन नाहीं.

४. सासू शब्द (स्त्रीलिंग.)

प्र. सासू सासू, सासवा

द्वि. सासूला, सासवेला सासूंना, सासवांना इ०.

याप्रमाणेंच वाळू, दारू, टाळू, जाऊ, पाऊ, यांचीं रूपें जाणावीं. 'पिसू' याचीं रूपें-पिसू; पिसा, पिसवा; पिसूला, पिसेला, पिसवेला; पिसांना, पिसवांना, इ०.

( एकाक्षरी. )

१. बी शब्द ( स्त्रीलिंग. )

| | | |
|---|---|---|
| प्र० | बी | बिया |
| द्वि० | बीला, बियेला | बियांना इ०. |

याप्रमाणेंच स्त्री शब्द.

२. बीं शब्द ( नपुंसक. )

| | | |
|---|---|---|
| प्र० | बीं | बियें |
| द्वि० | बियाला | बियांना इ०. |

३. पू शब्द ( पुल्लिंग. )

| | | |
|---|---|---|
| प्र० | पू | पू |
| द्वि० | पवाला | पुवांना इ०. |

याप्रमाणेंच रू शब्द.

४. जूं शब्द ( नपुंसक. )

| | | |
|---|---|---|
| प्र० | जूं | जुवें |
| द्वि० | जुवाला | जुवांना इ०. |

९. ऊ शब्द ( स्त्रीलिंग. )

| | | | |
|---|---|---|---|
| प्र० | ऊ | उवा | |
| द्वि० | ऊला, उवेला | उवांना | इ० |

---

बायको शब्द.

| | | | |
|---|---|---|---|
| प्र० | बायको | बायका | |
| द्वि० | बायकोला | बायकांना | इ० |

आते शब्द.

| | | | |
|---|---|---|---|
| प्र० | आते | आता | |
| द्वि० | आतेला | आतांना | इ० |

वन्सें शब्द.

| | | | |
|---|---|---|---|
| प्र० | वन्सें | वन्सें, वन्सा | |
| द्वि० | वन्सेला | वन्सेंना, वन्सांना | इ० |

'वन्सें' हा शब्द प्रायः अनेकवचनींच येतो एकवचनीं क्वचित्.

## सर्वनाम.

मी, तूं, तो, हा, जो, कोण, काय, आपण, हीं सर्वनामें होत.

'मी' याला उत्तमपुरुष, 'तूं' याला मध्यमपुरुष, आणि इतर नामसर्वनामांला अन्यपुरुष, हीं नांवें आहेत. यांनाच प्रथमपुरुष, द्वितीयपुरुष, तृतीयपुरुष, असें ह्मणतात.

मी, तूं, कोण, काय, आपण,—हे शब्द तीन्ही लिंगीं समान आहेत.

तो, हा, जो, पुल्लिंग; यांच्या जोडीचे ती, ही, जी, स्त्रीलिंग; आणि तें, हें, जें, नपुंसक शब्द होतात.

### सर्वनामांच्या विभक्ति.

'मी'

| विभक्ति. | एकवचन. | अनेकवचन. |
| --- | --- | --- |
| प्र० | मी | आम्ही |
| द्वि० | मला | आम्हांला |
| तृ० | मी, म्या | आम्ही |

| | | |
|---|---|---|
| च० | मजसाठीं | आम्हांसाठीं |
| पं० | मजहून | आम्हांहून |
| ष० | माझा | आमचा |
| स० | माझ्यांत,मजमध्यें | आमच्यांत |

सर्वनामास संबोधन नसतें.

'तूं'

| विभ० | एकव० | अनेकव० |
|---|---|---|
| प्र० | तूं | तुम्ही |
| द्वि० | तुला | तुम्हांला |
| तृ० | तूं, त्वां | तुम्ही |
| च० | तुजसाठीं | तुम्हांसाठीं |
| पं० | तुजहून | तुम्हांहून |
| ष० | तुझा | तुमचा |
| स० | तुझ्यांत, तुजमध्यें | तुम्हांत |

'तो'

| विभ० | एकव. | अनेकव. |
|---|---|---|
| प्र. | तो | ते |
| द्वि. | त्याला | त्यांना |

| | | |
|---|---|---|
| तृ. | त्यानें–णें | त्यांनीं–णीं |
| च. | त्यासाठीं | त्यांसाठीं |
| पं. | त्याहून | त्यांहून |
| ष. | त्याचा | त्यांचा |
| स. | त्यांत | त्यांत |

याप्रमाणेंच 'जो' शब्दाचीं रूपें जाणावीं.

'ती'

| | | |
|---|---|---|
| प्र. | ती | त्या |
| द्वि. | तिला | त्यांना |
| तृ. | तिनें–णें | त्यांनीं–णीं |
| च. | तिजसाठीं | त्यांसाठीं |
| पं. | तिजहून | त्यांहून |
| ष. | तिचा | त्यांचा |
| स. | तींत | त्यांत |

(पुल्लिंगाप्रमाणें)

याप्रमाणेंच 'जी' शब्दाचीं रूपें जाणावीं.

'तें'

| | | |
|---|---|---|
| प्र. | तें | तीं |
| द्वि. | त्याला | त्यांना |

पुढील रूपें पुल्लिंगाप्रमाणें.

याप्रमाणेंच 'जें' शब्दाची रूपें जाणावीं.

'हा'

| | | |
|---|---|---|
| प्र. | हा | हे |
| द्वि. | याला, ह्याला | यांना, ह्यांना |
| तृ. | यानें–णें, ह्यानें–णें | यांनीं–णीं, ह्यांनीं–णीं |
| च. | यासाठीं, ह्यासाठीं | यांसाठीं, ह्यांसाठीं |
| पं. | याहून, ह्याहून | यांहून, ह्यांहून |
| ष. | याचा, ह्याचा | यांचा, ह्यांचा |
| स. | यांत, ह्यांत | यांत, ह्यांत |

'ही'

| | | |
|---|---|---|
| प्र. | ही | या, ह्या |
| द्वि. | इला, हिला | अनेकवचनीं द्वितीयेपासून पुढील रूपें पुल्लिंगाप्रमाणें. |
| तृ. | इनें–णें, हिनें–णें | |
| च. | इजसाठीं, हिजसाठीं | |
| पं. | इजहून, हिजहून | |
| ष. | इचा, हिचा | |
| स. | ईंत, हींत | |

मराठी ... २०

‘ हें ’

| | | |
|---|---|---|
| प्र. | हें | हीं |
| द्वि. | याला, ह्याला | यांना, ह्यांना |

पुढील रूपें पुल्लिंगाप्रमाणें जाणावीं.

‘ कोण ’

| | | |
|---|---|---|
| प्र० | कोण | कोण |
| द्वि० | कोणाला | कोणांला |
| तृ० | कोणीं | कोणीं |
| च० | कोणासाठीं | कोणांसाठीं |
| पं० | कोणाहून | कोणांहून |
| ष० | कोणाचा | कोणांचा |
| स० | कोणांत | कोणांत |

‘ काय ’

| | | |
|---|---|---|
| प्र. | काय | काय |
| द्वि. | कशाला | कशांना |
| तृ. | कशानें | कशांनीं |
| च. | कशासाठीं | कशांसाठीं |
| पं. | कशाहून | कशांहून |

| | | |
|---|---|---|
| ष. | कशाचा | कशांचा |
| स. | कशांत | कशांत |

‘ आपण ’

| | | |
|---|---|---|
| प्र. | आपण | आपण |
| द्वि. | आपणाला | आपणांला |
| तृ. | आपण | आपण |
| च. | आपणासाठीं | आपणांसाठीं |
| पं. | आपणाहून | आपणांहून |
| ष. | आपला | आपला |
| स. | आपणांत | आपणांत |

यांत ‘आपणा’ याच्या स्थानीं ‘आपल्या’ असेंही क्वचित् सामान्यरूप होतें. ‘आपला’ या शब्दांचेंही सामान्यरूप असेंच.

## विशेषणें.

विशेषणांचे भेद दोन, संख्यावाचक आणि गुणवाचक.

एक, दोन, तीन, इत्यादि संख्यावाचक विशेषणें.

चांगला, बरा, लहान, मोठा, काळा, तांबडा, इत्यादि गुणवाचक विशेषणें.

विशेषणाच्या विभक्ति.

'एक'

(याला एकवचन मात्र आहे.)

पु, न. लि. एक, एकाला, एकानें, इ०.

स्त्रीलिंग. एक, एकीला, एकीनें, इ०.

पुढील शब्द तीन्ही लिंगीं समान. ह्यांना एकवचन नाहीं.

दोन, दोहोंला, दोहोंनीं, इ०.

तीन, तिहींला, तिहींनीं, इ०.

चार, चोहोंला, चोहोंनीं, इ०.

पांच, पांचांना, पांचांनीं, इ०.

गुणविशेषणाला विभक्ति प्रायः नामाप्रमाणेंच लागतात. जसें—

चांगला, चांगले, चांगल्याला, चांगल्यांना, इ०.

चांगली, चांगल्या, चांगलीला, चांगल्यांना, इ०.

चांगलें, चांगलीं, चांगल्याला, चांगल्यांना, इ०.

अकारांत, ईकारांत, ऊकारांत, विशेषणें तीन्ही लिंगीं समान असतात, त्यांना प्राय: विभक्ति लागत नाहींत. क्वचित् लागल्याच तर नामाप्रमाणें लागतात. जसें--

पु. न. मूर्ख, मूर्ख, मूर्खाला, मूर्खानें, मूर्खांनीं, इ०.
स्त्री. मूर्ख, मूर्ख, मूर्खेला, मूर्खेनें, मूर्खांनीं, इ०.
तीन्हीलिं. कडू, कडू, कडूला, कडूनें, कडूंनीं, इ०.

## ध्यानांत ठेवण्याचे नियम.

( संस्कृत किंवा परभाषांतील शद्बांना हे लागत नाहींत. )

१ सध्यांच्या निवळ मराठी शद्बांमध्यें ' सी ' आणि ' स्या ' हीं अक्षरें नाहींत. त्यांच्या स्थानीं ' शी ' आणि ' शा ' हीं अक्षरें येतात. जसें,--असा, असे, अशी, अशानें, इ०.

परंतु संस्कृत शद्ब सीता, सोमा, शील, काशी, इत्यादिकांत स, श, असतील तसेच ठेवावे.

२ अंत्य अक्षर ऱ्हस्वाचें दीर्घ झालें, तर त्याच्या मागचे दीर्घ ई ऊ ऱ्हस्व होतात. जसें,--पीठ, पिठाला; चूल, चुली; समजूत, समजुती; इ०.

तीनअक्षरी—वटीक, बटकी; परीट, परटीण. पण विहीण, विहिणी; माहूत, माहुतीण. मुईण, मुइणी, मुयणी; देऊळ, देउळें, देवळें; इ०.

अव्यय.

ज्या शब्दापासून निरनिराळीं पदें होत नाहींत, म्हणजे लिंग, वचन, विभक्ति, यांमुळें ज्याला विकार होत नाहीं, तें अव्यय.

अव्ययांचे भेद चार,—१ पदार्थक, २ प्रत्ययार्थक, ३ वाक्यार्थक, आणि ४ संयोजक. यांनाच १ क्रियाविशेषण, २ शब्दयोगि, ३ उद्गारवाचि आणि ४ उभयान्वयि, असें ह्मणतात.

१ पदार्थक अव्ययांचे पोट भेद चार.

एथें, तेथें, कोठें, जवळ, वर, इत्यादि स्थलबोधक.

आतां, उद्यां, केव्हां, एव्हां, इत्यादि कालबोधक.

कां, कारणबोधक.

फटकन्, झटदिशीं, इत्यादि रीतिबोधक.

२ प्रत्ययार्थक अव्ययें,—पाशीं, कडून, शीं, करितां, मुळें, पेक्षां, विषयीं, वर, खालीं, इत्यादि.

३ वाक्यार्थक अव्ययें,—अरेरे, वाहवा, धन्य, छी:, इत्यादि.

४ संयोजक अव्ययें,—आणि, अथवा, किंवा, ह्मणून, कीं, कांकीं, कारण, कारणकीं, इत्यादि.

---

## धातुशब्द.

धातुशब्दाच्या विभक्तीला **आख्यात** अथवा **क्रियापद** म्हणतात.

धातुशब्द दोन प्रकारचे, **सकर्मक** आणि **अकर्मक**.

जो कोणी कांहीं करितो, तो त्या क्रियेचा **कर्ता**. जसें,—'मुलगा खेळतो.' यांत खेळतो कोण? तर, मुलगा. ह्मणून **मुलगा** हा कर्ता.

कर्त्याची क्रिया ज्याला घडते, तें **कर्म**. जसें,—'नारायण पोथी वाचतो.' यांत नारायण वाचतो काय? तर पोथी. ह्मणून **पोथी** हें कर्म.

ज्या धातुशब्दानें दाखविलेल्या क्रियेला कर्म असतें, तो **सकर्मक**. जसें,—खा, सांग, दे, इत्यादि.

ज्या धातुशद्बानें दाखविलेल्या क्रियेला कर्म लागत नाहीं, तो अकर्मक. जसें,—ये, बस, चाल, इत्यादि.

आख्यातें आठ. प्रत्येक आख्याताचीं, प्राधान्य, पुरुष, लिंग, वचन, यांवरून ० रूपांतरें होतात.

प्राधान्य तीन प्रकारचें असतें. कर्त्याचें, कर्माचें आणि क्रियेचें.

ज्या क्रियापदामध्यें कांहीं करणें हा अर्थ प्रबळ असतो, त्यांत कर्त्याचें प्राधान्य. जसें,—हरी धांवतो; तो पोथी लिहितो; इ०. यालाच कर्तृप्रधान क्रियापद म्हणावें.

ज्या क्रियापदामध्यें कोणी दुसऱ्यानें केलेली क्रिया भोगणें हा अर्थ प्रबळ असतो, त्यांत कर्माचें प्राधान्य. जसें,—काम करावें; घोडा आणिला; इ० यालाच कर्मप्रधान क्रियापद म्हणावें.

ज्या क्रियापदामध्यें केवळ क्रियेचाच अर्थ प्रबळ असतो, त्यांत क्रियेचें प्राधान्य. जसें,—बसावें, जावें, इत्यादि. यालाच भावप्रधान क्रियापद म्हणावें.

सकर्मक धातूंचीं व-प्रत्ययांत आणि ल-प्रत्ययांत रूपें मात्र कर्मप्रधान. त्यांचीं इतर रूपें, आणि अकर्मक धातूंचीं सर्व रूपें कर्तृप्रधान.

भावप्रधान रूपें वेगळीं शिकायाला नकोत. तीं यांतच येतात. सकर्मकांचीं व-ऊ-प्रत्ययांत आणि अकर्मकांचीं व-प्रत्ययांत, तृतीय पुरुषीं नपुसकलिंगीं एकवचनीं जीं रूपें, तींच प्रसंगीं भावप्रधान होतात. वाक्ययोजनेवरून त्यांचा भेद समजतो.

## सामान्य नियम.

१. लिही, पी, धू, भी, इत्यादि धातूंपुढें दीर्घाक्षरी प्रत्यय आला, तर त्यांचे अंत्य ई ऊ ऱ्हस्व होतात. जसें,—लिहिलें, पितो, धुणार, भितो, इ०.

२. दीस, शीक, चूक, इत्यादि धातूंपुढें कोणताही प्रत्यय आला, तर त्यांतील ई ऊ ऱ्हस्व होतात. जसें,—दिसतो, शिकत, चुकला, लुटलें, इ०.

# क्रियापदाची रूपावलि.

## प्रथम आख्यात.

(याचा अर्थ वर्तमान अथवा रीतिवर्तमान काळ.)

### हस धातु, अकर्मक.

| | एकवचन. | अनेकवचन. |
|---|---|---|
| उत्तम पुरुष. | मी हसतों, पु० <br> मी हसतें, स्त्री० <br> मी हसतें, नपुं० | आम्ही हसतों |
| मध्यम पुरुष. | तूं हसतोस <br> तूं हसतेस <br> तूं हसतेंस | तुम्ही हसतां |
| अन्य पुरुष. | तो हसतो <br> ती हसते <br> तें हसतें | ते <br> त्या } हसतात <br> तीं |

याप्रमाणें धाव, नाच, ये, जा, दे, घे, इत्यादिकांचीं रूपें जाणावीं.

अकारांत सकर्मक धातूंचीं रूपें सोडतों, सोडितों; करतों, करितों; अशीं दोनदोन होतात. परंतु पाह, साह, वाह, चाह, माग, सांग, बघ, ह्मण, बोल, शीक, पढ, चाव, समज, जाण, यांचीं रूपें पाहतों, साहतों, अशीं एकेकच. इच्छ, प्रार्थ, अर्प, यांचीं इच्छितों, प्रार्थितों, अर्पितों, अशीं एकेकच.

## दुसरें आख्यात.

( याचा अर्थ भूतकाळ अथवा संकेत. )

| | | |
|---|---|---|
| उ० पु० | मी हसलों<br>मी हसलें<br>मी हसलें | आह्मी हसलों |
| म० पु० | तूं हसलास<br>तूं हसलीस<br>तूं हसलेंस | तुह्मी हसलां |
| अ० पु० | तो हसला<br>ती हसली<br>तें हसलें | ते हसले<br>त्या हसल्या<br>तीं हसलीं |

याप्रमाणें पड, झड, चाल, इत्यादि अकारांत अकर्मक धातूंचीं, आणि न्हा, ने, लिही, यांचीं रूपें जाणावीं.

अकारांत सकर्मक धातूंचीं रूपें सोडला, सोडिला; आणला, आणिला; अशीं दोनदोन होतात. परंतु पाह, साह, राह, वाह, चाह, इच्छ, प्रार्थ, अर्प, यांचीं पाहिला, साहिला, राहिला, वाहिला, चाहिला, इच्छिला, प्रार्थिला, अर्पिला, अशीं एकेकच. वाह याचें अकर्मकीं क्वचित् 'वाहला' असेंही रूप आढळतें. जाण, याचें प्रायः 'जाणलें' असें रूप.

## विलक्षण धातुशब्द आणि त्यांचीं रूपें.

| | | | |
|---|---|---|---|
| सांग | सांगितला | दे | दिला |
| माग | मागितला | गा | गाइला |
| बघ | बघितला | मा | माइला |
| घाल | घातला | म्हण | म्हणाला (कर्तृप्र.) म्हटला (कर्मप्र.) |
| धू | धुतला | ह्मण | ह्मटला, ह्मणला |
| घे | घेतला | पळ | पळाला |
| ये | आला | ऊड | उडाला |
| जा | गेला | | |

| | | | |
|---|---|---|---|
| हो | झाला, जाहला | बूड | बुडाला. |
| खा | खाल्ला, खाल्ला. | नीघ | निघाला |
| पी | प्याला | वीझ | विझाला, विझला |
| वी | व्याली | बूज | बुजाला, बुजला |
| भी | भ्याला | वीर | विरला, विराला |
| ले | ल्याला | जीर | जिरला, जिराला |
| कर | केला | लप | लपला, लपाला |
| मर | मेला | आहे | होता |

या आख्यातीं सकर्मक धातूंचीं रूपें **कर्मप्रधान** असतात. परंतु जे धातु मुळीं अकर्मक असून सकर्मकाप्रमाणें ही योजले जातात, अशा कांहीं धातूंचीं रूपें **कर्तृप्रधान** होतात. जसें,—तो बारा वर्षें **पढतो**, तो व्याकरण **पढला**. तो चांगला शिकतो, तो गणित शिकला. मुका मनुष्य बोलतो काय? तो चार शब्द **बोलला**. तो खेळतो, तो सोंकट्या **खेळला**. वेणू जेवते, ती दूधभात **जेवली**. गाय व्याली, ती गाय पाडा व्याली. तो कुत्रा चावतो, तो कोणाला **चावला**? तो मुलगा झोपेमध्यें भ्याला, हरी सापाला भ्याला. गंगेस घोडे न्हाले, ते गंगा

म्हाले. याप्रमाणेंच मी पाणी प्यालों. विठू तुमचें ह्मणणें समजला, ती त्याला शिवली, तो काय म्हणाला?. इत्यादि. परंतु 'त्यानें काय म्हटलं?' हं वाक्य कर्मप्रधान.

उत्तम आणि मध्यम पुरुषीं कर्मप्रधान क्रियापद येत नाहीं. क्वचित् कवितेंत मात्र आढळतें. जसें,—श्रीकृष्णें मी तारिलों. मोहापासाव सोडविलों. दुष्टांनीं तूं छळिलास. इत्यादि.

## तिसरें आख्यात.

( याचा अर्थ रीतिभूतकाळ. जुन्या भाषेमध्यें ऐतिहासिकवर्तमान अथवा भूतकाळ. )

| | एकव. | अनेकव. |
|---|---|---|
| उ० | मी हसें | आम्ही हसूं |
| म० | तूं हसेस | तुम्ही हसां |
| अ० | तो, ती, तें, हसे | ते, त्या, तीं, हसत |

याप्रमाणें चाल, नीघ, नाच, इत्यादि अकारांत अकर्मक धातु; पढ, शीक, बोल, खेळ, चाव, म्हण,

समज, इत्यादि कित्येक अनेकाक्षरी धातु; आणि सांग, माग, वच, हे धातु; यांचीं रूपें जाणावी.

इतर अकारांत सकर्मक धातूंचीं, आणि राह, वाह, या अकर्मक धातूंचीं रूपें,—मी सोडीं, तूं सोडीस, तो सोडी, आम्ही सोडूं, तुम्ही सोडां, ते सोडीत, अशा प्रकारें होतात.

येे (एकाक्षरी) धातूचीं रूपें.

| | | |
|---|---|---|
| उ० | मी येईं | आह्मी येऊं |
| म० | तूं येईस | तुह्मी यां |
| अ० | तो येई | ते येत |

याप्रमाणें जा, दे, घे, भी, पी, वी, ने, खा, हो, धू, यांचीं रूपें होतात. भी, पी, वी, हे पुढें दीर्घ अक्षर असतां, नियमाप्रमाणें आधीं ऱ्हस्व होतात, हें ध्यानात ठेवावें. मध्यमपुरुष अनेकवचनीं जां, द्यां, खां, घ्यां, प्यां, व्यां, भ्यां, न्यां, व्हां, धुवां.

## चवथें आख्यात.

(याचा अर्थ भविष्यत्काळ अथवा संशय.)

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

| | एकव. | अनेकव. |
|---|---|---|
| उ० | मी हसेन | आम्ही हसूं |
| म० | तूं हसशील | तुम्ही हसाल |
| अ० | तो, ती, तें, हसेल | ते, त्या, तीं, हसतील |

याप्रमाणें चाल, नीघ, नाच, इत्यादि अकारांत अकर्मक, आणि पढादिकांतील अनेकाक्षरी, आणि सांग, माग, वघ, या सकर्मक धातूंचीं रूपें जाणावीं.

इतर सकर्मक धातूंच्या रूपांमध्यें मी सोडीन, तो सोडील, इतकाच भेद. इतर रूपें पूर्ववत्. जेव, वाह, राह, या धातूंचीं रूपें अशींच, जेवीन, इ०.

ये (एकाक्षरी) धातूचीं रूपें.

| | | |
|---|---|---|
| उ० | मी येईन | आम्ही येऊं |
| म० | तूं येशील | तुम्ही याल |
| अ० | तो, ती, तें, येईल | ते, त्या, तीं, येतील |

याप्रमाणेंच जा, दे, घे, भी, पी, वी, ने, खा, न्हा, धू, इत्यादिकांचीं रूपें जाणावीं.

मध्यम अनेकवचनीं जाल, द्याल, घ्याल, भ्याल, प्याल, व्याल, न्याल, खाल, न्हाल, धुवाल, इ०.

## पांचवें आख्यात.

(याचा अर्थ भविष्यत्काळ आणि निश्चय.)

| | एकव. | | अनेकव. | |
|---|---|---|---|---|
| उ० | मी | हसणार | आम्ही | हसणार |
| म० | तूं | | तुम्ही | |
| अ० | तो, ती, तें | | ते, त्या, तीं | |

याप्रमाणेंच इतर धातूंचीं रूपें जाणावीं. पुढें 'णार' लावला ह्मणजे झालें. इच्छ याचें मात्र 'इच्छिणार'.

## साहवें आख्यात.

(याचा अर्थ उत्तमपुरुषीं प्रश्न, मध्यम पुरुषीं आज्ञा किंवा प्रार्थना, आणि अन्यपुरुषीं इच्छा.)

| | एकव. | अनेकव. |
|---|---|---|
| उ० | मी हसूं? | आम्ही हसूं? |
| म० | तूं हस | तुम्ही हसा |
| अ० | तो, ती, तें, हसो | ते, त्या, तीं, हसोत |

याप्रमाणेंच इतर धातूंचीं रूपें जाणावीं. अस आणि बस यांचीं मध्यमपुरुषीं अस, ऐस; बस बैस; अशीं दोनदोन रूपें होतात. पाह, वाह, राह, साह, यांचीं दोन्ही वचनीं पहा, वहा, रहा, सहा, अथवा पाहा, राहा, वाहा, साहा, अशीं होतात.

## सातवें आख्यात.

( याचा अर्थ धर्म, संभव, योग्यता, आणि क्वचित् रीतिभूत काळ. )

हस धातूंचीं हीं रूपें तादृश प्रचारांत नसल्यामुळें **असधातु** घेतों.

| | एकव. | अनेकव. |
|---|---|---|
| उ० | मी असावा | आम्ही असावे |
| | मी असावी | आम्ही असाव्या |
| | मी असावें | आम्ही असावीं |
| म० | तूं असावास | तम्ही असावेत |
| | तूं असावीस | तुम्ही असाव्यात |
| | तूं असावेंस | तुम्ही असावींत |

| | | | |
|---|---|---|---|
| अ० | तो असावा | | ते असावे |
| | ती असावी | | त्या असाव्या |
| | तें असावें | | तीं असावीं |

याप्रमाणेंच इतर धातूंचीं रूपें जाणावीं. लिही याचें रूप लिहावा. पाह, वाह, राह, साह, यांचीं रूपें पहावा-पाहावा.; रहावा-राहावा ; वहावा-वाहावा; सहावा-साहावा; अशीं होतात. ये, जा, इत्यादि एका-क्षरी धातूंचीं रूपें—यावा, जावा, द्यावा, ध्यावा, म्यावा, प्यावा, व्यावी, न्यावा, खावा, व्हावा, धुवावा, इ०.

या आख्यातीं सकर्मकधातूंचीं रूपें कर्मप्रधान; त्यांतील उत्तम मध्यम रूपें प्रचारांत येत नाहींत. अन्यपुरुष रूपें मात्र येतात. जसें,—वाईट मार्ग सोडावा, विद्या शिकावी, इत्यादि.

## आठवें आख्यात.

( याचा अर्थ असिद्धसंकेत. )

| | एकव. | अनेकव. |
|---|---|---|
| उ० | मी हसतों<br>मी हसतें<br>मी हसतें | आम्ही हसतों |
| म० | तूं हसतास<br>तूं हसतीस<br>तूं हसतेंस | तुम्ही हसतां |
| अ० | तो हसता<br>ती हसती<br>तें हसतें | ते हसते<br>त्या हसत्या<br>तीं हसतीं |

या प्रमाणेंच इतर धातूंचीं रूपें जाणावीं. अर्थात् धातूंला सरळ प्रत्यय लागतात. इच्छ, प्रार्थ, अर्प, या धातूंपासून मात्र इकार लागून 'इच्छितों' इत्यादि रूपें होतात.

धातूंपासून जीं नामें, विशेषणें, आणि अव्ययें होतात तीं कृदंतें. त्यांतील फार उपयोगी मात्र एथें देतों.

| | अकर्मकधातु. | सकर्मकधातु. |
|---|---|---|
| | हस | सोड |
| कर्तृवाचक नामें किंवा विशेषणें. | हसता | सोडता |
| | हसणारा | सोडणारा |
| | हसणार | सोडणार |
| | हसत | सोडीत |
| भूतार्थक विशेषण. | हसला, हसलेला | सोडला, सोडलेला |
| | (कर्तृप्र.) | सोडिला, सोडिलेला (कर्मप्र.) |
| क्रियावाचक नामें. | हसणें | सोडणें |
| | हसावें | सोडावें |
| | हसूं | सोडूं |
| वर्तमानक्रियावोधक अव्ययें. | हसतां | सोडतां, सोडितां |
| | हसतांना | सोडतांना, सोडितांना |
| पूर्व क्रियावोधक अ० | चालून | सोडून |
| संकेतार्थक अव्यय | चालल्यास | सोडल्यास |

यांतील वहुतेकांची सिद्धि मागें गेलेल्या अशा-

च रूपांच्या क्रियापदांवरून जाणावी. इतरांची सरळच आहे.

अस धातु फार उपयोगी, त्याचीं मुख्यरूपें.

| आ०. | रूपें. | अर्थ. |
| --- | --- | --- |
| १. | मी असतों, इ०. | वर्तमान अथवा रीतिवर्तमान. |
| २. | मी असलों, इ०. | संकेत. ( असधातूच्या या आख्याताचा हा एकच अर्थ. इतर धातूंप्रमाणें भूतकाळ हा अर्थ एथें नसतो. ) |
| ३. | मी असें, इ०. | रीतिभूतकाळ, इ०. |
| ४. | मी असेन, इ०. | भविष्यकाळ अथवा संशय. |
| ५. | मी असणार, इ०. | भविष्यकाळ आणि निश्चय. |
| ६. | मी असूं, इ०. | प्रश्न, आज्ञा, इच्छा. |
| ७. | मी असावा, इ०. | धर्म, योग्यता, इ०. |
| ८. | मी असतों, इ०. | असिद्धसंकेत. |

अस धातूचीं केवळ सत्तार्थक रूपें.—भेद दाखविण्यास्तव याला 'आहे' धातु हें नांव दिलें आहे.

### प्रथम आख्यात. (वर्तमानकाळ.)

| | एकव. | अनेकव. |
|---|---|---|
| उ. | मी आहें | आम्ही आहों |
| म. | तूं आहेस | तुम्ही आहां |
| अ. | तो, ती, तें, आहे | ते, त्या, तीं, आहेत |

### दुसरें आख्यात. (भूतकाळ.)

| | एकव. | अनेकव. |
|---|---|---|
| उ. | मी होतों<br>मी होतें<br>मी होतें | आम्ही होतों |
| म. | तूं होतास<br>तूं होतीस<br>तूं होतेंस | तुम्ही होतां |
| अ. | तो होता<br>ती होती<br>तें होतें | ते होते<br>त्या होत्या<br>तीं होतीं |

इतर आख्यातीं असें, असेन, असणार, असूं, असावा, असतों, इत्यादि पूर्ववत्.

## पाहिजे धातु.

### प्रथम आख्यात ( वर्तमानकाळ. )

| | |
|---|---|
| उ. मी पाहिजे | आम्ही पाहिजे |
| म. तूं पाहिजेस | तुम्ही पाहिजेत |
| अ. तो, ती, तें, पाहिजे | तें, त्या, तीं पाहिजेत, पाहिजत. |

### चवथें आख्यात ( भविष्यत्काळ, संशय. )

अ. पाहिजेल

'पाहिजे' याचीं इतर रूपें होत नाहींत.

## हवा धातु.

### प्रथम आख्यात.

| | एकव० | अनेकव० |
|---|---|---|
| उ. | मी हवा | आम्ही हवे |
| | मी हवी | आम्ही हव्या |
| | मी हवें | आम्ही हवीं |
| म. | तूं हवास | तुम्ही हवेत |
| | तूं हवीस | तुम्ही हव्यात |
| | तूं हवेंस | तुम्ही हवींत |

| | |
|---|---|
| अ. तो हवा | ते हवे, हवेत |
| ती हवी | त्या हव्या, हव्यात |
| तें हवें | तीं हवीं, हवींत |

इतर रूपें नाहींत. याप्रमाणेंच 'व्हावा' धातु.

## होय धातु.

### प्रथम आख्यात.

| एकव. | अनेकव. |
|---|---|
| उ. मी होय | आम्ही हों |
| म. तूं होस | तुम्ही व्हां |
| अ. तो, ती, तें, होय | ते, त्या, तीं, होत |

इतर रूपें नाहींत.

**नस** धातु ( अस याच्या उलट. )

मी नसतों, नसलों, नसें, नसेन, नसणार, नसूं, नसावा, नसतों, इत्यादि.

**नाहीं** धातु(आहे याच्या उलट.)प्रथम आख्यात.

मी नाहीं, तूं नाहींस, तो नाहीं, आम्ही नाहीं, तुम्ही नाहीं, ते नाहींत. इ०.

दुसरें आख्यात ( भूतकाळ. )

मी नव्हतों, तूं नव्हतास, तो नव्हता, आम्ही नव्हतों, तुम्ही नव्हतां, ते नव्हते, इ०.

नव्हे धातु ( होय याच्या उलट. )

मी नव्हें, तूं नव्हेस, तो नव्हे, आम्ही नव्हों, तुम्ही नव्हां, ते नव्हेत, नव्हत.

**नको** धातु ( पाहिजे याच्या उलट. )

मी नको, तूं नकोस, तो नको, आम्ही नको, तुह्मी नका, ते नकोत.

**नलगे** धातु ( पाहिजे याच्या उलट. )

मी नलगें, तूं नलगेस, तो नलगे, आम्ही नलगे, तुम्ही नलगेत, ते नलगेत.

**नये** धातु ( याचीं केवळ अन्यपुरुषीं रूपें. )

| | | |
|---|---|---|
| अ. पु. | नये | नयेत |

इतर रूपें नाहींत.

**हो** धातु ( प्रथम आख्यात. )

| | एकव. | अनेकव. |
|---|---|---|
| उ. | मी होतों–तें–तें | आह्मी होतों |

म. तूं होतोस—तेस तेंस तुह्मी होतां

अ. { तो होतो / ती होते / तें होतें } { ते / त्या / तीं } होतात

हीं रूपें सरळ आहेत. तरी 'आहे' धातूचीं दुसऱ्या आख्याताचीं रूपें, आणि 'हो' धातूचीं हीं प्रथमाख्याताचीं रूपें कांहीं कांहीं समान आहेत. त्यांचा गोंधळ होऊं नये, ह्मणून यांतील भेद नीट ध्यानांत ठेवावा. याचीं इतर रूपें—झालों, होई, होईन, होणार, होऊं, व्हावा, होतों, इ०.

## व-प्रत्ययांत धातु.

मूळ धातूला 'व' प्रत्यय लागल्यानें शक्त्यर्थक धातु होतात. जसें,—बसव, चालव, आणव, इत्यादि. धातु एकाक्षरी असल्यास त्याला 'वव' हा प्रत्यय लागतो. जसें, येवव, देवव, घेवव, इत्यादि.

शक्त्यर्थक धातूपासून अन्यपुरुषीं मात्र रूपें होतात; त्यांत पुनः मूळधातु अकर्मक असल्यास तीं नपुंसकलिंगीं एकवचनीं मात्र होतात. जसें,—

## सकर्मक धातु सोड.

| | एकव. | अनेकव. |
|---|---|---|
| अ. पु. | सोडवतो—ते—तें | सोडवतात. |

पुढील रूपें, अकर्मकाप्रमाणें, सोडवला, सोडवे, सोडवेल, सोडवणार, सोडवो, सोडवावा, सोडवता, इ०. हीं रूपें कर्मप्रधान असतात.

मूळ अकर्मकधातूपासून बसवतें, बसवलें, बसवे, बसवेल, बसवणार, बसवो, बसवावें, बसवतें, इतकींच रूपें. हीं भावप्रधान असतात.

## ईव-प्रत्ययांत धातु.

मूळ धातूला ‘ईव’ प्रत्यय लागल्यानें प्रयोजक धातु होतात. जसें,—करीव, देवीव, इत्यादि. हे सर्व सकर्मक. यांचीं रूपें इतर सकर्मक धातुंच्या रूपांप्रमाणें. उदाहरणार्थ करीव धातु.—

| | एकव. | अनेकव. |
|---|---|---|
| उ. | मी करिवतों, करवितों<br>मी करिवतें, करवितें<br>मी करिवतें, करवितें | आह्मी करिवतों, करवितों |

याप्रमाणेंच इतर रूपें जाणावीं.

'करीव' यापासून पुनः 'करवीव' असा दुसरा प्रयोजक धातु होतो. याचीं रूपें सरळ, करवितों, करविवला, इत्यादि एकेकच.

कित्येक अकर्मक धातूंपासून प्रयोजक धातु होत नाहींत. तथापि त्यांमध्येंच कांहीं रूपांतर होऊन सकर्मक होतात. ते असे—

| अकर्मक. | सकर्मक. | अकर्मक. | सकर्मक. |
|---|---|---|---|
| पड | पाड | ये | आण |
| झड | झाड | दीस | दाखीव |
| सूट | सोड | दब | दाब |
| फूट | फोड | गळ | गाळ |
| तूट | तोड | सर | सार |
| मर | मार | टळ | टाळ |
| फाट | फाड | चर | चार |
| लाग | लाव | तर | तार |
| फीट | फेड | इ०. | इ० |

कित्येक धातु रूपांतर न पावतां प्रसंगाप्रमाणें अकर्मक किंवा सकर्मक होतात. जसें.—दार उघडतें ( अक० ); तो दार उघडतो, त्यानें दार उघडलें (सक०). यांना उभयविध धातु ह्मणतात.

कांहीं धातु मुळीं सकर्मक असून प्रसंगीं अक-

मेक होतात. जसें,—या खलामध्यें हें औषध चांगलें घोटतें ( म्हणजे घोटलें जातें, )इ०.

## वाक्ययोजना.

मनांतील कांहीं कल्पना उघड करणारी जी पदांची योजना, तें वाक्य. जसें, हरी पुस्तक वाचतो.

वाक्यांतील पदांचा एकमेकांशीं कांहींनाकांहीं योग्य संबंध असला पाहिजे. तो नसेल तर असंबद्ध प्रलाप होईल.

वाक्यामध्यें कर्ता आणि क्रियापद अशीं दोन तरी पदें असलीं पाहिजेत. क्रियापद सकर्मक असेल, तर त्याला कर्महीं असलें पाहिजे.

### प्राधान्य.

प्राधान्य म्हणजे क्रियापदावर अधिकार. प्राधान्य तीन प्रकारचें,—कर्त्याचें, कर्माचें, आणि क्रियेचें. ( पृष्ठ ३१वें पहा. )

क्रियापद अकर्मक असल्यास, त्यामध्यें कर्त्याचें किंवा क्रियेचें प्राधान्य असतें. क्रियापद सकर्मक असल्यास त्यामध्यें कर्त्याचें, किंवा

कर्माचें, किंवा क्रियेचें, प्राधान्य असतें. ( पृष्ठ ३२वें पहा. )

वाक्यांतील क्रियापद जर कर्तृप्रधान असलें, तर कर्त्याची विभक्ति प्रथमा असते, आणि कर्त्याचें जें लिंग, जें वचन, आणि जो पुरुष असेल, तेंच लिंग, तेंच वचन, आणि तोच पुरुष क्रियापदाचा असतो. जसें हरी चालतो, मनी बोलते, पाखरें उडालीं, इ०.

कर्तृप्रधान क्रियापदाला जर कर्म असलें, तर त्या कर्माची विभक्ति प्रथमा किंवा द्वितीया असते. जसें सदू पुस्तक वाचतो. नारायण शास्त्र पढला. ( पृष्ठ ३६वें पहा. ) मांजर उंदराला धरतें, किंवा उंदीर धरतें, इ०.

यांत कर्मपद जर विशेषनाम अथवा प्राण्याच्या स्थानीं योजलेलें सर्वनाम असलें, तर बहुशः त्याची विभक्ति द्वितीया असते. जसें, तो हरीला धरतो; तूं मला पाठीव, इ०.

जर क्रियापद कर्मप्रधान असलें, तर कर्त्याची

विभक्ति तृतीया, कर्माची प्रथमा, आणि कर्माचें जें लिंग, जें वचन, आणि जो पुरुष असेल, तेंच लिंग, तेंच वचन, आणि तोच पुरुष, क्रियापदाचा असतो. जसें रामानें रावण मारिला; कृष्णानें मुरली वाजविली; इ०.

कर, ठरीव, नेम, अशा कांहीं धातूंना केव्हां केव्हां दोनदोन कर्मे असतात. त्यांतून दुसरें कर्म तर सर्वदा प्रथमांतच असते. पण पहिलेंही कर्म जर प्रथमांत असलें, तर त्यालाच अनुसरून कर्मप्रधान क्रियापदाचे लिंग-वचन-पुरुष असतात. जसें,—राजानें ती स्त्री आपली राणी केली; त्या लोकांनीं ती वेषधारी कन्या मोठा चतुर पुरुष मानिली; इत्यादि.

परंतु पहिलें कर्म जर द्वितीयांत असलें, तर दुसऱ्या कर्मालाच अनुसरून त्या क्रियापदाचे लिंग-वचन-पुरुष असतात. जसें,—प्रधानानें आपल्या सात मुलींना सात राजांच्या राण्या केल्या; विष्णुपंतांनीं नारायणरावाला आपला जांवई केला; राजानें त्या वेषधारी स्त्रीला आपला प्रधान केला; इ०. दुसऱ्या कर्माच्या स्थानीं केवळ विशेषण असलें, तरी असा प्रयोग होतो. जसें,—गोविंदरावांनीं आपला पुत्र (किंवा, आपल्या पुत्राला) विद्वान् केला; मनोनें आपला

बाहुली ( किंवा, आपल्या बाहुलीला ) पाटावर उभी केली; इ०. यांत ' विद्वान् ',' उभी ' हीं विशेषणें नामवत् मानावीं, किंवा त्यांपुढें ' पुरुष '; ' बाहुली ', असे शब्द अध्याहृत ह्मणजे गुप्त मानावे. एथें कर्म द्वितीयांत असतां क्रियापद भावप्रधानही होतें. जसें, वैद्यानें तिला बरें केलें, इ०.

क्रियापद शक्त्यर्थक असतां त्याच्या कर्त्याची विभक्ति द्वितीया किंवा सविकरण तृतीया असते. जसें,—मला अथवा माझ्यानें काम करवतें; त्याच्यानें पत्र लिहवतें; इ०.

षष्ठीचा प्रत्यय लागून त्यापुढें तृतीयेचा प्रत्यय लागतो, त्या विभक्तीला सविकरण तृतीया ह्मणतात.

क्रियापद भावप्रधान असतां, कर्ता तृतीयांत, आणि त्याला कर्म असल्यास तें द्वितीयांत असतें. क्रियापद तृतीयपुरुषीं, नपुंसकलिंगीं, एकवचनीं, असतें.- जसें,—त्यानें जावें; रामानें रावणास मारिलें; तुम्ही चोरास धरावें. इ०.

शक्त्यर्थाचीं उदाहरणें,—माझ्यानें अथवा मला चालवतें, त्याच्यानें चोरास धरवलें, इ०.

'प्रधानानें सात मुलींना सात राजांच्या राण्या **केलें**,' असाच जखडलेला प्रयोग करण्याविषयीं कित्येकांचा आग्रह आहे; परंतु भाषेमध्यें असा प्रयोग नाहीं. ह्मणून हा अशुद्ध. याप्रमाणेंच 'त्यानें तिला **मारिली**,' 'तिनें त्याला **धरिला**,' इत्यादि प्रयोग क्वचित् बोलण्यांत येतात, परंतु हे सर्वसंमत नव्हेत. ह्मणून हेही त्याज्य.

उजेड, सांजाव, कळमळ, मळमळ, बन, फाव, असे पांच सात अकर्मक धातु मोठे चमत्कारिक आहेत. यांच्या क्रियापदांना वेगळा कर्ता नसतो. पण, उजेड होतो—उजेडतें; सांज होते—सांजावतें; कळमळ होतें—कळमळतें; मळमळ होते—मळमळतें; कांहीं कृत्य बनविण्याला वेळ मिळते—बनतें; कांहीं वस्तु 'भावयितुं' ह्मणजे घडविण्याला वेळ मिळते—फावतें; याप्रमाणें क्रियापदामध्येंच कर्त्याचा अर्थ मिसळलेला असतो, दिसण्यामध्यें वेगळा कर्ता नसतो. ह्मणून यांना **अकर्तृक** किंवा **भावकर्तृप्रधान** क्रियापदें ह्मणतात.

ल-प्रत्ययांत कृदंतापुढें जा धातु लागून सर्व आख्यातीं कर्मप्रधान संयुक्तक्रियापद होतें; याच्या कर्त्याला 'कडून' हा प्रत्यय लागतो. जसें,—

मामलतदाराकडून हुकूम फर्माविला गेला, सरकाराकडून अपराध्याला शिक्षा केली जाईल, इ०.

तां-प्रत्ययांत कृदंतापुढें ये धातु लागून शक्त्यर्थक क्रियापदें होतात. जसें, मुलाला चालतां येतें (भावप्रधान.) त्याला पुस्तकें वाचतां येतात. (कर्मप्रधान.)

क्रियापद कर्मप्रधान असून जेव्हां वाक्यामध्यें त्याच्या कर्त्याची अपेक्षा नसते, तेव्हां त्याला **कर्मकर्तृप्रधान** म्हणतात. जसें,—सदाशिवराव भाऊ लढाईंत **मारले गेले**; श्रम केला, तर विद्या साध्य होईल, इ०.

## विशेषण आणि विशेष्य.

संस्कृतांत आणि जुन्या मराठींत नामाची जी लिंग-वचन-विभक्ति तीच विशेषणाची असे. परंतु चालू मराठींत विशेषणाच्या विभक्तींचा लोप होतो. जसें,—सुंदर कन्येनें, कडू फळांचा, इ०.

लिंगभेदाप्रमाणें आ—ई—एँकारांत होणारीं जीं विशेषणें, त्यांच्या विभक्तींचा जरी लोप झाला, तरी

सामान्यरूप राहतें. जसें,—**चांगल्या** मुलाला, **मोठ्या** घरीं, इ०.

स्त्रीलिंग विशेषणाचेंही सामान्यरूप पुल्लिंगाप्रमाणेंच होतें. जसें,–**पिवळ्या** काठीचा, **शाहण्या** मुलीनें, इ०.

क्वचित् **मोठे** मुलानें. **पिवळे** काठीला, **तांबडे** रंगाचा, इत्यादि प्रकारेंही विशेषणाचीं रूपें होतात.

ज्या नामाचें जें विशेषण, तें त्या विशेषणाचें विशेष्य. जसें,–'चांगला मुलगा,' यांत **चांगला** हें विशेषण, आणि **मुलगा** हें विशेष्य.

षष्ठी विभक्ति हें ही विशेषणच आहे. ह्मणून संबद्ध शब्दाच्या रूपाप्रमाणें तिचीं रूपें वेगवेगळीं होतात. जसें–माझा, माझी, माझें, माझे, माझ्या, माझीं, इ०. इतर विशेषणांप्रमाणेंच याच्या पुढील विभक्तीचा लोप होऊन सामान्य रूप होतें. जसें–**त्याच्या** घरांत, **याच्या** विद्येचें फळ, इ०.

सर्वनामेंही विशेषणाप्रमाणें योजतां येतात. जसें;–**तो** मुलगा. **त्या** मुलानें, **मला** नारायणाला, **तूं** हरीनें, इ०.

अस, ठर, हो, बन, निपज, कळाजा, इत्यादि क्रियापदांच्या संगतीं अर्थपूरणासाठीं केव्हां केव्हां प्रथमांत नाम, अथवा विशेषण, याची योजना होते.

जसें,—नारायण **विद्यार्थी** आहे, गोविंद उत्तम टरला, विनायक शिपाई झाला, इ०. यांतील विशेषणाचें लिंग-वचन विशेष्याप्रमाणें असतें; परंतु नामाविषयीं तो नेम चालत नाहीं. जसें,—नाटकामध्यें सदू **द्रौपदी** झाला; यमुना **अभिमन्यु** झाली, इ०. अशा **नामाला विधिनाम**, आणि **विशेषणाला विधिविशेषण** म्हणतात.

ज्याविषयीं पुढें कांहीं सांगायाचें असेल, त्याच्या नांवापुढें लिंगभेदाप्रमाणें हा हें सर्वनाम, वाक्य गोड करण्यासाठीं, लावतात. जसें,—हरी हा शाहणा आहे, यमुना आणि कृष्णी ह्या ठेंगण्या आहेत, शाहुराजानें बाजीराव **याला** पेशवाई दिली. इ०. परंतु त्या सर्वनामानें दर्शविलेलें पुनः दुसरें नाम पुढें असेल तर, त्याच्या लिंगवचनाप्रमाणें हा याचें लिंगवचन होतें. जसें,—पुणें **ही** पेशव्यांची **राजधानी** होती; मुंबई हें मोठें शहर आहे; ती वेषधारी कन्या हा राजानें आपला **प्रधान** केला; इ०.

# विभक्तींचे अर्थ.

प्रथमेचे अर्थ कर्ता, कर्म, उद्दिष्ट, विधान, विशेषण, आणि परिमाण.

हरी पोथी वाचतो; यांत **हरी** ही कर्त्रर्थी प्रथमा, **पोथी** ही कर्मार्थी प्रथमा.

शिवाजी हा राजा होता; यांत **शिवाजी** ही उद्दिष्टार्थी प्रथमा; **राजा** ही विधानार्थी प्रथमा.

अयोध्याधीश रामचंद्र फार सात्विक होता; यांत **अयोध्याधीश** ही विशेषणार्थी प्रथमा.

एक शेर तांदूळ; यांत **शेर** ही परिमाणार्थी प्रथमा.

द्वितीयेचा अर्थ कर्म, कर्ता, आणि संप्रदान.

**कर्म**—शिपाई **चोराला** धरतो.

**कर्ता**—**त्याला** उद्योग करवतो.

**संप्रदान**—**भिकाऱ्याला** अन्न देतो, **त्याला** खेळणें आवडतें, इ०.

तृतीयेचे अर्थ कर्ता, करण, हेतु अंगविकार, आणि साहित्य.

**कर्ता**—**रामानें** यावें, **गोपाळानें** पत्र वाचलें.

**अंगविकार**—**पायानें** लंगडा.

| | |
|---|---|
| करण—काठीनें मारतो. | साहित्य—मळक्या |
| हेतु—वयानें वडील. | पोषाखानें फिरतो. |

चतुर्थीचा अर्थ तादर्थ्य. पैशासाठीं श्रम करितो.

पंचमीचा अर्थ अपादान म्हणजे वियोग अथवा तारतम्य.

वियोग—पुण्याहून आला.
तारतम्य—हरीहून लहान.

घर, हात, इत्यादि कांहीं शब्दांची पंचमी घरून, हातून, अशी होते, हें ध्यानांत ठेवावें.

षष्ठीचा अर्थ अनेक प्रकारचा संबंध—

गोविंदाचें अक्षर, द्रव्याचें रक्षण, मजूरीचें काम, गव्हांचें पीठ, पिठाचे गहूं, राजाचा वाडा, इ०. रात्रीचा फिरतो, ही अधिकरणीं षष्ठी.

सप्तमीचा अर्थ अधिकरण म्हणजे स्थान अथवा काल.

स्थान—घरांत बसतो.
काल—सोमवारीं आला.

घर, हात, पाय, इत्यादि अकारांतांची सप्तमी घरीं, हातीं, पायीं, अशीही होते; पायां, माथां, हेही शब्द 'पा-

यां पडणें,' ' माथां शेंदूर पाझरे,' यांत येतात, हें ध्यानांत ठेवावें.

संबोधन म्हणजे हांक मारणें.—हे **राजा, अरे मुला,** इ०.

वरील अर्थांतील कर्ता, कर्म, करण, संप्रदान, अपादान, आणि अधिकरण, यांचा संबंध क्रियेशीं असतो, म्हणून यांना **कारकें** म्हणतात.

**आख्यातांचे अर्थ.**—वर्तमान काळ म्हणजे चालती वेळ, भूतकाळ म्हणजे गेली ती वेळ, भविष्यकाळ, म्हणजे पुढें येणार ती वेळ.

**संयुक्तक्रियापदें.**—बहुतेक आख्यात रूपांपुढें असधातूचीं रूपें लागून संयुक्त क्रियापदें होतात. जसें,—

मी करीत आहें—अपूर्ण वर्तमान.
मी करीत असतों—रीतिवर्तमान
मी करीत होतों—अपूर्ण भूत.
मी करीत असें—रीतिभूत.

मी केलें असेल—भूत भविष्य अथवा संशयार्थ भूत.
मी केलें असावें—संशयार्थ भूतवर्तमान
मी केलें असलें—संकेतार्थ भूतवर्तमान.

मी करीत असेन—अपूर्ण भविष्य, अथवा संशयार्थ वर्तमान.

मी करीत असणार—अपूर्ण भविष्य

मी करीत असूं?—प्रश्न इ०.

मी करीत असावें—रीतिभूत, अथवा विध्यर्थ.

मी करीत असलों—संकेत

मी करीत असतों—असिद्ध संकेत.

मी केलें आहे—भूतवर्तमान

मी केलें होतें—भूत भूत.

मी केलें असतें—असिद्धसंकेत

मी करणार आहे—भविष्य वर्तमान

मी करणार होतों—भविष्य भूत.

मी करणार असेन—भविष्य भविष्य अ०संशय भविष्य

मी करणार असावा—संशय भविष्य

मी करणार असलों—संकेत भविष्य इ०.

क्रियेचा गुण दाखविण्याकरितां कारकांचा उपयोग करितात; त्याप्रमाणेंच पदार्थक (म्हणजे क्रियाविशेषण) अव्ययांचा आणि विशेषणांचाही करितात. जसें,—तो **लौकर** आला; ती **चांगली नाचते**; तो **हसत बोलतो**; इ०.

क्रियापद सकर्मक असतां क्रियाविशेषण कर्माच्या अनुरोधानें वागतें. जसें,—तो मुलगा श्लोक **चांगले** गातो; ती बाई चोळी **वांकडी** शिवते; इ०.

क्रियापद अकर्मक असतां, क्रियाविशेषण नपुंसकीं हो आढळतें. जसें,—तो मुलगा चांगला बोलतो, किंवा चांगलें बोलतो. परंतु या दुसऱ्या वाक्यामध्यें 'बोलणें' हें कर्म गुप्त असून क्रियापद सकर्मक आहे असा भास होतो.

जो यापुढें तो हा शब्द आला पाहिजे. जसें,—जो श्रम करील तो फळ मिळवील. इ०. यांच्या मध्यें लिंगभेद आणि विभक्तिभेदही असूं शकतो. जसें,—जें कांहीं ऐकूं येतें, तो शब्द; जो गांव राजाच्या राहण्याचा, ती राजधानी; ज्याचें नांव विष्णु त्याला बोलाव; इ०.

याप्रमाणें जर यापुढें तर, आणि जरी यापुढें तरी, असे शब्द आले पाहिजेत. 'जर तो आला, तर मी येईन;' 'जरी त्याला पुष्कळ सांगितलें, तरी तो ऐकेना;' इ०. जो, जर, जरी, हे शब्द गुप्तही असतात. 'करील तो भरील,' इ०.

वाक्यामध्यें आधीं कर्ता, मग कर्म, आणि शेवटीं क्रियापद यावें, आणि ज्या पदाचें विशेषण

ज्या पदापूर्वी यावें, हा सामान्य नियम आहे. परंतु बोलणाराच्या मनामध्यें ज्या पदावर विशेष नेट द्यावयाचा असेल तें पद वाक्याच्या आरंभीं येतें. जसें,—चांगला आहे तो मुलगा;' 'नको हीं मला कटकट;' 'आधीं या तुह्मी इकडे;' इ०.

प्राधान्यभेद--

कर्तृप्रधान—तो काम करितो.
कर्मप्रधान—त्याकडून काम केलें जातें.

कर्तृप्रधान—ती असावी.
भावप्रधान—तिनें असावें.

कर्मप्रधान—रामानें रावण मारिला.
कर्तृप्रधान—राम रावणास मारता झाला.
भावप्रधान—रामानें रावणास मारिलें. इ०.

नकार जोडण्याची रीति.

| | |
|---|---|
| करितो करीत आहे—करीत नाहीं. | करो—न करो. |
| | करावें—करूं नये. |

केलें, केले आहे—केलें नाहीं.
करीन, करणार—करणार नाहीं.
करीं, करीत असें—करीत नसें.
करूं, करूं—करूं नको.
करितों—( असिद्धसंकेत ) न करितों.
केलें असलें—केलें नसलें.
केलें असेल—केलें नसेल.
केलें असतें—केलें नसतें.
करवतें—करवत नाहीं.

यांविगळीं, आणि विशेषकरून संकेतार्थ असतां, न केलें, नकरील, नकरीं, नकरावें, नकरवतें, अशीं हीं रूपें होतात.

## ध्यानांत ठेवण्याजोगे अनेक प्रकारचे प्रयोग.

१ 'रामा आणि गोविंदा घरीं गेले.'

२ 'त्याचा घोडा, गाडी, आणि **पागोटें** काय **झालें**? (ह्मणजे घोडा काय झाला, गाडी काय झाली, आणि पागोटें काय झालें!) अथवा हीं काय झालीं!'

३ 'आह्मी राजा आणि राणी पाहिली, अथवा राजा आणि राणी हीं पाहिलीं.'

४ 'मी तूं आणि तो गेलों;' 'तो आणि तूं गेलास अथवा गेलां.'

५ 'त्यानें घर **बांधायाचें होतें**.' (कर्मप्रधान, विध्यर्थ भूतकाळ.)—अर्थ, बांधणें हें योग्य होतें.

६ 'त्यानें जायाचें होतें.' ( भावप्रधान, विध्यर्थ, भूत-काळ. )—वरच्या प्रमाणेंच अर्थ. (एथें 'बांधावें होतें,' 'जावें होतें,' असे प्रयोग कोणी करितात, पण ते सर्वमान्य नव्हेत.)

७ 'त्याला ( कर्ता ) घर (कर्म) बांधायाचें आहे, कामें (कर्म) करायाचीं आहेत.' (कर्मप्र०, विध्यर्थ भविष्यत्काळ.)-अर्थ, आवश्यकता.

८ 'त्याला (कर्ता ) जायाचें आहे.' (भावप्र.)-अर्थ, आवश्यकता.

९ 'त्याला ( कर्ता ) गोविंदाला ( संप्र. ) पैसे (कर्म ) पाठवायाचे आहेत' ( कर्मप्र. ); 'हरीला (कर्ता ) वाघाला ( कर्म ) मारायाचें आहे' ( भावप्र. )–अर्थ आवश्यकता.

१० 'तो घरीं जायाचा (विशेषण) आहे.'–अर्थ, नेमणूक. (अशा प्रकारचा सकर्मकाचा प्रयोग होत नाहीं. पण याच अर्थाचे अकर्मकीं 'तो जाणार आहे,' सकर्मकीं 'तो काम करणार आहे,' असे प्रयोग होतात.)

११ तो या वेळेस घरीं जायाचा नाहीं (जाणार नाहीं. ) अर्थ, निश्चित गोष्ट. यांत 'जायाचा' हे विशेषण मानावें, किंवा 'जायाचा नाहीं' हें सगळें क्रियापद मानावें. हें अधिक चांगलें. याप्रमाणेंच 'तो काम करायाचा नाहीं,' यांत 'करायाचा नाहीं' हें सगळें क्रियापद मानावें.

१२ 'तो न सांगतां निघून जायाचा,' 'पाहतां पाहतां तो लोकांचे खिसे कापायाचा.' अर्थ, संभव. यांत 'जायाचा,' 'कापायाचा' हीं विशेषणें असून क्रियापदांप्रमाणें योजलीं आहेत. वस्तुतः मराठींतील बहुतेक क्रियापदें मुळचीं विशेषणेंचआहेत.

१३ 'सगळें काम झालें, आतां घरीं जायाचें.'–अर्थ प्रसक्ति, ह्मणजे क्रमानुसारें प्राप्ति. यांत 'जायाचें' हा कर्ता आणि 'आहे' हें गुप्त क्रियापद (कर्तृप्र० ), अथवा 'आपण जायाचें' असा ( भावप्र० ) प्रयोग मानावा. 'आतां पोथी वाचायाची.' यांत 'वाचायाची' हें विशेषण, अथवा 'वाचायाची आहे' हें ( कर्मकर्तृप्र० ) क्रियापद मानावें.

१४ 'जौ पैसा या कामाला लागायाचा' (लागण्याला शक्य आहे), यांत 'लागायाचा' हें विशेषण, पूर्ववत् (उदा. १२ पहा.) क्रियापदाप्रमाणें मानतां येईल.

१५ 'आह्मी काम केलें पाहिजे,' 'आह्मांला काम केलें पाहिजे,' यांत क्रियापदें कर्मप्रधान. याप्रमाणेंच 'गेलें पाहिजे' ( भाव प्र०. )–अर्थ, आवश्यकता. या स्थळीं 'करायाला पाहिजे,' 'जायाला पाहिजे,' असेही प्रयोग आढळतात; परंतु ते तितके प्रशस्त मानले जात नाहींत. 'करायास पाहिजे,' 'जायास पाहिजे,' हे प्रयोग तर अगदीं एकदेशीय मानले जातात. अर्थात् सर्वमान्य नव्हेत.

१६ तथापि इच्छा हा अर्थ असतां, 'त्याला खायाला पाहिजे,' 'शिकायाला नको,' हे प्रयोग प्रशस्त आहेत. यांत 'खायाला,' 'शिकायाला' हे वाक्यांतील कर्ते आहेत.

१७ 'त्याला लाडू खायाला पाहिजेत,' (इच्छा); 'ही गोष्ट मला तुह्मी सागायाला नको,' (आनावश्यकता). यांत ही सूक्ष्मपणें पाहतां, कर्माचें प्राधान्य आहेच. तथापि एथें लाडू आणि गोष्ट हे कर्ते, आणि पाहिजेत आणि नको हीं क्रियापदें मानण्यास अडचण दिसत नाहीं.

१८ आपण एवढें काम केलें पाहिजे.—अर्थ आग्रहाची आणि नम्रतेची विनंती.

१९ त्याला घरीं बसायाला (कर्ता) मिळतें, खेळायाला (कर्ता) सापडतें.

२० तो चालूं लागला, काम करूं लागला. यांत चालूं, करूं, हीं कृदंतनामे, प्रथमांत, आणि 'लागला' या सकर्मक क्रियापदाचीं कर्मे. अथवा 'चालूं लागला,' 'करूं लागला,' अशीं दोन्हीं पदें मिळून संयुक्त क्रियापद (कर्तृप्रधान.) यांच्या स्थळीं 'करायास लागला,' 'जायास लागला,' हे क्वचित् आढळणारे प्रयोग प्रायः एकदेशीय मानिले जातात. यांपेक्षां 'करायाला लागला,' 'जायाला लागला,' हे कांहीं बरे.

२१ याप्रमाणेंच ‘तो म्हणाला’ याच्या स्थानीं ‘म्हणायास लागला,’ ‘म्हणायाला लागला,’ ‘म्हणूं लागला’ हे लांबट प्रयोग वाईट दिसतात. तथापि, ‘तो श्लोक म्हणूं लागला,’ (म्ह० त्यानें श्लोक म्हणायाला आरंभ केला,) इत्यादि प्रयोग प्रशस्त आहेत.

२२ ‘(तूं) त्याला काम करूं दे,’ ‘(तुम्ही) त्याला काम करूं द्या.’ यांत ‘काम’ हें ‘करूं दे’ आणि ‘करूं द्या’ यांचें कर्म. कोल्हापूर प्रांतीं ‘तो काम करूंदे’ (म्ह० करो), ‘ते काम करूंदेत (म्ह०करोत,) असे प्रयोग आढळतात; परंतु हे सर्वमान्य नव्हेत, आणि केव्हांकेव्हां तर हे फार उद्धट दिसतात.

याप्रमाणेंच ‘त्यानें पोथी लिहूं दिली,’ ‘मुलानें अंगरखा फाटूं दिला,’ यांमध्यें ही संयुक्त क्रियापदें मानावीं.

२३ ‘त्याला (कर्ता) काम (कर्म) करावें लागतें, अथवा करायाचें पडते.’ (कर्मप्र.) ‘त्याला जावें लागतें’ (भावप्र.)—अर्थ, आवश्यकता.

२४ ‘तो काम करीना;’ म्ह० त्याला काम करण्याची इच्छा झाली नाहीं. (भूतकाळ.) ‘तो धोंडा हलेना;’ म्ह० त्याच्या अंगीं हलण्याचें सामर्थ्य नव्हतें. (भूतकाळ.) ‘तो तें काम खुशाल करीना;’ म्ह० का करीत नाहीं? खुशाल करो, त्याला प्रतिबंध नाहीं. (वर्तमान.)

२५ वाक्यांत कर्माचें किंवा क्रियेचें प्राधान्य असतांही, कर्ता जर मध्यमपुरुषी एकवचनीं असेल, तर क्रियापदापुढें 'स' हें अक्षर प्रशस्तपणें लागतें. जसें—तूं काम केलेंस तूं घरीं जावेंस, इ०. अनेकवचनीं कर्ता असल्यास 'त' हें अक्षर क्वचित् लागतें. जसें, तुह्मी त्याला धरिलेंत, इ०.

२६ 'पुरे' ह्मणजे जितकें अवश्य पाहिजे तितकें आहे. अनेकवचन 'पुरेत.' यांविगळीं पुरतें, पुरतात, इत्यादि इतर अकर्मक धातूंच्या रूपांप्रमाणें रूपें होतातच.

२७ 'कोण जाणे?' ह्मणजे कोणी जाणत नाहीं. मला ठाऊक नाहीं. 'न जाणों' ह्मणजे आह्मी जाणत नाहीं; कदाचित्. याप्रमाणेंच 'नकळे' ह्म० कळत नाहीं, ठाऊक नाहीं. 'कोण जाणे' यामध्यें थोडासा उद्धटपणा दिसतो.

२८ सर्व धातुशब्दांवरून झालेलीं जीं भूतार्थक क्रियापदें, त्यांनाही नामांप्रमाणें विभक्ति लागतात. अर्थात् त्या वेळेस तीं नामेंच आहेत. जसें, केल्याला, केल्यास, केल्यानें, केल्यापासून, केल्याचा, केल्यांत, केल्यामुळें, केल्यावरून, इ०. यांना प्रथमा नाहीं, आणि यांचा मूळशब्द काय, हें ही स्पष्ट सांगतां येत नाहीं. 'केल्या' हें सामान्यरूप आहे, इतकें मात्र समजतें. याला 'कर' याचें क्रियावाचक भूत कृदंत नाम ह्मणावें, आणि विभक्ति असेल ती सांगावी, ह्मणजे

झालें. हें नपुंसकलिंगी आहे. उदा० ' दुकाळ पडल्याला (म्ह०दुकाळ पडला होता, या गोष्टीला ) आठ वर्षें झालीं; ' ' चितूला ( अथवा चितू ) इकडे आल्याला दोन महिने झाले.' इ०. याच्या स्थानीं 'चितूला इकडे येऊन दोन महिने झाले, ' असाही प्रयोग आढळतो. ' उद्योग केल्यास ( उद्योग केला, या गोष्टीला, अथवा जर उद्योग केला तर ) फळ मिळेल. ' या वाक्यांत भूतार्थ नाहीं, केवळ संकेत आहे. एथें 'केल्यास ' या शब्दाला नुसतें संकेतार्थक कृदंत अव्यय मानण्यासही बाध नाही. तात्पर्य एकच.

२९ याप्रमाणें करायाला, करावयाला, इत्यादिकांचाही मूळशब्द अमुक असें स्पष्ट सांगतां येत नाहीं. जसें, ' तो विद्या शिकायाला अ० शिकायास मुंबईस आला आहे,' 'चणे खायाला त्याला दांत नाहींत, इ०. हीं पूर्ववत् क्रियावाचक नामें खरीं, पण यांत भूतार्थ नाहीं. करायाला, खायाला, यांच्या स्थानीं करायला, खायला, अशीं संक्षिप्त रूपेंहीं बोलण्यांत येतात. तथापि यांच्याच जोडीचीं स-प्रत्ययांत रूपें–करायस्, बसायस्, इत्यादि जरी क्वचित् कोठें ऐकण्यांत आलीं , तरी तीं प्रशस्त मानलीं जात नाहींत.

३० ' पत्र पोचतांच वर्तमान समजलें. ' ' चोरानें गाठोडें उचलतांच गवगवा झाला. ' यांत ' पोचतां, ' ' उच-

२५ वाक्यांत कर्माचें किंवा क्रियेचें प्राधान्य असतांही, कर्ता जर मध्यमपुरुषी एकवचनीं असेल, तर क्रियापदापुढें 'स' हें अक्षर प्रशस्तपणें लागतें. जसें—तूं काम केलेंस तूं घरीं जावेंस, इ०. अनेकवचनीं कर्ता असल्यास 'त' हें अक्षर क्वचित् लागतें. जसें, तुह्मी त्याला धरिलेंत, इ०.

२६ 'पुरे' ह्मणजे जितकें अवश्य पाहिजे तितकें आहे. अनेकवचन 'पुरेत.' यांवेगळीं पुरतें, पुरतात, इत्यादि इतर अकर्मक धातूंच्या रूपांप्रमाणें रूपें होतातच.

२७ 'कोण जाणे?' ह्मणजे कोणी जाणत नाहीं. मला ठाऊक नाहीं. 'न जाणों' ह्मणजे आह्मी जाणत नाहीं; कदाचित्. याप्रमाणेंच 'नकळे' ह्म० कळत नाहीं, ठाऊक नाहीं. 'कोण जाणे' यामध्यें थोडासा उद्धटपणा दिसतो.

२८ सर्व धातुशब्दांवरून झालेलीं जीं भूतार्थक क्रियापदें, त्यांनाही नामांप्रमाणें विभक्ति लागतात. अर्थात् त्या वेळेस तीं नामेंच आहेत. जसें, केल्याला, केल्यास, केल्यानें, केल्यापासून, केल्याचा, केल्यांत, केल्यामुळें, केल्यावरून, इ०. यांना प्रथमा नाहीं, आणि यांचा मूळशब्द काय, हें ही स्पष्ट सांगतां येत नाहीं. 'केल्या' हें सामान्यरूप आहे, इतकें मात्र समजतें. याला 'कर' याचें क्रियावाचक भूत कृदंत नाम ह्मणावें, आणि विभक्ति असेल ती सांगावी, ह्मणजे

झालें. हें नपुंसकलिंगी आहे. उदा० ' दुकाळ पडल्याला (म्ह० दुकाळ पडला होता, या गोष्टीला ) आठ वर्षें झालीं; ' ' चिंतूला ( अथवा चिंतू ) इकडे आल्याला दोन महिने झाले.' इ०. याच्या स्थानीं 'चिंतूला इकडे येऊन दोन महिने झाले, ' असाही प्रयोग आढळतो. ' उद्योग केल्यास ( उद्योग केला, या गोष्टीला, अथवा जर उद्योग केला तर ) फळ मिळेल. ' या वाक्यांत भूतार्थ नाहीं, केवळ संकेत आहे. एथें 'केल्यास ' या शब्दाला नुसतें संकेतार्थक कृदंत अव्यय मानण्यासही बाध नाहीं. तात्पर्य एकच.

२९ याप्रमाणें करायाला, करावयाला, इत्यादिकांचाही मूळशब्द अमुक असें स्पष्ट सांगतां येत नाहीं. जसें, ' तो विद्या शिकायाला अ० शिकायास मुंबईस आला आहे,' 'चणे खायाला त्याला दांत नाहींत, इ०. हीं पूर्ववत् क्रियावाचक नामें खरीं, पण यांत भूतार्थ नाहीं. करायाला, खायाला, यांच्या स्थानीं करायला, खायला, अशीं संक्षिप्त रूपेंही बोलण्यांत येतात. तथापि यांच्याच जोडीचीं स-प्रत्ययांत रूपें—करायस् बसायस्, इत्यादि जरी क्वचित् कोठें ऐकण्यांत आलीं , तरी तीं प्रशस्त मानलीं जात नाहींत.

३० ' पत्र पोचतांच वर्तमान समजलें, ' ' चोरानें गाठोडें उचलतांच गवगवा झाला. ' यांत ' पोचतां, ' ' उच-

ल्तां ' हीं भूतार्थक अव्ययें आहेत. आणि ' उचल ' धातु सकर्मक असल्यामुळें, त्या कारणास्तव 'उचलतांच ' यामध्यें कर्माचें प्राधान्य ध्वनित होतें, आणि त्यामुळें कर्ता तृतीयांत होतो. पोंचतांच ( पोंचे तआच ) ह्मणजे पोंचतें किंव पोंचलें तेंव्हांच, उचलतांच ( उचली तआच ) ह्मणजे उंचलतो किंवा उचललें तेंव्हांच. (संस्कृत 'तदा एव.') भविष्यत्काळींही या प्रकारचें वाक्य येतें. जसें,–सोळावें वर्ष संपतांच तो देश पहायाला निघणार आहे.

३१ ' च ' या अव्ययाचा अर्थ ' निश्चयें करून '. अर्थात् हें क्रियाविशेषण आहे. च, ही ( समुच्चयार्थक अव्यय ), हे शब्द पूर्वशब्दांलीं चिकटून लिहिण्याचा संप्रदाय पडलाआहे.

३२ सूर्य उगवतांक्षणींच ( उगवे तदा क्षणामध्येंच, अथवा उगवे तत्क्षणींच ) यांत ' उगवतां ' आणि ' क्षणीं ' हे शब्द वेगवेगळे मानावे; अथवा उगवतांक्षणीं ' हें सर्व संयुक्त अव्यय मानावें; अथवा ज्या क्षणीं सूर्य उगवतो, तो सूर्य उगवताक्षण आणि त्याक्षणीं ह्म० सूर्य उगवता ( अथवा उगवते ) क्षणीं; अशा प्रकारें ' उगवता ' हें ' क्षण ' याचें विशेषण मानावें.

३३ जातांजातां, लिहितां लिहितां, इत्यादि द्विरुक्त अव्ययें वर्तमानकालबोधक आहेत. जसें,–तो मुलगा पुस्तक

वाचतां वाचतां झोंपीं गेला; चालतां चालतां तो उड्या मारूं लागला, इ०.

३४ ' सूर्य उगवे पर्यंत, ' यांत सूर्य उगवे (म्ह. उगवतो, उगवला, उगवेल,) तोंपर्यंत असा स्पष्ट अर्थ घ्यावा. अथवा ' सूर्य उगवे ' हें सर्व वाक्य नामाप्रमाणें मानून त्यापुढें ' पर्यंत ' हें अव्यय मानणें कित्येकांस बरें दिसतें.

३५ अव्ययांचा उपयोग केव्हां केव्हां नामाप्रमाणें होतो. जसें,—केव्हांपासून म्हणजे कोणत्या वेळेपासून; उद्यांसाठीं म्हणजे येत्या दिवसासाठीं. इ०.

३६ ल-प्रत्ययांत कृदंताचे अर्थ.—निजलेलें (जें निजले आहे तें) मूल. केलेलें (कोणीतरी केलें आहे तें) काम. राहिलेलें (ज्या घरीं आपण राहत असूं तें) घर. चाललेली (ज्या वाटेनें आपण कधींतरी चाललों होतों ती) वाट. गाणें ऐकलेला (ज्यानें गाणें ऐकलें आहे असा) मनुष्य. पैसा पाठविलेला (ज्याला किंवा ज्यानें पैसा पाठविला होता तो) मनुष्य. इ०. वाक्याच्या ओघावरून हे अर्थ लक्षांत घ्यावे.

३७ डोक्यांत पागोटें घालणें, पायांत जोडा घालणें, अंगात अंगरखा घालणें, इत्यादि प्रयोगाचा अर्थ—डोक्याच्या आश्रयानें पागोट्याची योग्य योजना करणें, इत्यादि प्रकारें होतो.

३८ 'अश्व म्हणजे घोडा.' याचा सूक्ष्म शब्दार्थ पाहिला तर 'घोडा अश्व म्हटला जातो,' असा आहे. परंतु असें उलट वाक्य न घेतां, 'अश्व (सुगमशब्दानें अथवा अर्थानें) घोडा आहे,' असा भावार्थ घेण्यास बाध दिसत नाहीं. म्हणून 'अश्व' हा कर्ता, 'घोडा' हें विधिनाम, 'आहे' हें अध्याहृत क्रियापद, आणि 'म्हणजे' हें क्रियाविशेषण.

३९ 'त्याला कोणी अपशब्द बोलतां नये.' (कर्मप्रधान) अर्थ,—अपशब्द बोलणें योग्य नव्हे.

४० 'त्यानें कथा निवेदन केली.' अशा प्रकारचे शिथिल प्रयोग न करितां, 'त्यानें कथा निवेदित केली,' किंवा 'कथेचें निवेदन केलें,' किंवा दोहोंचा मिळून एक शब्द करून, 'कथानिवेदन केलें' असा प्रयोग करावा, हें योग्य दिसतें. तथापि जेथें शिथिल प्रयोग आढळेल, तेथें 'निवेदन' हें नाम 'निवेदित' या विशेषणाच्या अर्थी योजलें आहे, असें मानून निर्वाह करून घ्यावा.

४१ 'पैसा असला म्हणजे सर्व मिजाशी आठवतात.' यांत 'म्हणजे' याचा अर्थ 'तर' किंवा 'तर मग' (संकेतार्थक अव्यय.). 'दुपार झाली म्हणजे सूर्य पश्चिमेस वळतो' यांत 'म्हणजे' याचा अर्थ 'नंतर.' 'म्हटलें म्हणजे अशी गोष्ट होऊं नये.' यांत 'म्हटलें म्हणजे' इतकें सर्व क्रियाविशेषण. अर्थ,—'प्रशस्त गोष्ट कोणती असें म्हटलें तर.'

४२ प्रश्नवाक्यांमध्यें कोण, काय, कोठें, अशा प्रकारचा कांहीं खरोखरीं प्रश्नार्थक शब्द नसला, तर प्रायः 'काय?' हें अव्यय योजतात. जसें,–'पुस्तक मिळालें काय?' केव्हां केव्हां बोलण्याच्या सुरावरूनच प्रश्न समजतो. जसें,—नाना आला? इ०. केव्हां केव्हां कीं, किंवा, यांचाही प्रयोग होतो. जसें,–तूं येणार कीं नाहीं? तो आला किंवा नाहीं? इ०.

४३ कोणत्याही भाषणावर नेट द्यायाचा असला, तर 'नव्हे काय?' किंवा 'कां नाहीं?' या अर्थाचें 'ना' असें अव्यय शेवटीं योजतात. जसें,–'अरे मुला इकडे ये–आला ना?' 'अहो जातां कां? घटकाभर बसाना?' इ०. प्रश्नांतील अर्थ आपणाला इष्ट किंवा विदित आहे, असेंही यापासून ध्वनित होतें. जसें,– 'तो गृहस्थ संभावित आहे?' 'तो लबाड तर नाहींना?' 'गोविंदराव आले आहे-तना, त्यांना भेटायाला गेलें पाहिजे.'

४४ 'रामा ह्मणून एक मुलगा होता.' यांत 'रामा ह्म-णून' (ह्म० रामा ह्मटलेला) हें 'मुलगा' याचें विशेषण.

४५ 'तुह्मी पत्र पोंचतांच निघून येणें.' यांत 'येणें' हें नाम 'यावें' या अर्थी क्रियापदाप्रमाणें योजलें आहे (कर्म०) भावप्रधान

४६ 'तो मुलगा भला आहे.' ह्मणून (किंवा 'यामुळें, किंवा 'आणि त्यामुळें') सर्वांस आवडतो. यांत 'ह्मणून याच्या स्थळीं 'आणि ह्मणून' असें ह्मणूं नये.

४७ 'वाघ मारिला गेला,' इत्यादि स्थळीं 'वाघ मेला गेला' इत्यादि प्रकारें अकर्मक क्रियापदाचा प्रयोग करूं नये. तो अशुद्ध आहे.

४८ बोल, ह्मण, आणि सांग, यांच्या प्रयोगामध्यें कित्येक लोक फार गोंधळ करितात. तो नव्हावा ह्मणून हीं शुद्ध उदाहरणें दिलीं आहेत.—

**बोल.**—हा मुलगा फार बोलतो. बोलूंनको, चूप राहा. तो माझ्याशीं बोलत नाहीं. मला जें कांहीं बोलायाचें आहे, तें मी थोडक्यांत बोलतों. तो कधींही खोटें बोलत नसतो.

**ह्मण.**—सदू नित्य रामरक्षा ह्मणतो. क ह्मण, ट ह्मणूंनको. जेवणाला अजून अवकाश आहे. तुह्मांला स्तोत्र विस्र ह्मणायाचें असेल तर स्वस्थपणें ह्मणा.

**सांग.**—हें वर्तमान तुह्मांला कोणी सांगितलें? मी तुमचा निरोप त्याला कालच सांगितला (किंवा कळविला.) मी तुला सांगतों कीं तूं असला वेडेपणा करूं नकोस. मला जें कांहीं सांगायाचें असेल तें मी उद्यां सांगेन.

तुमचें बोलणें मला समजलें नाहीं; तुम्ही ह्मणतां काय, हें मला नीट सांगा. मी ह्मणतों कीं तुम्ही त्या मूखाचें बोलणें ऐकून फसूं नका. तो कोणालाही भलतेंच कांहीं तरी सांगत असतो.

## मराठी भाषेची उत्पत्ति.

'संस्कृत' ह्मणून जी प्राचीन भाषा सुप्रसिद्ध आहे, तिजमध्यें अंतर पडतांपडतां कांहीं काळानें 'माहाराष्ट्री' ह्मणून ( २००० वर्षांमागें ) भाषा झाली, आणि माहाराष्ट्रीमध्यें अंतर पडतांपडतां सांप्रतची 'मराठी' भाषा झाली आहे. मराठीमध्यें पुनः शुद्ध संस्कृत शब्द मिसळले आहेत. यांशिवाय मुसलमान राजांच्या सहवासानें आरबी, फारसी, हिंदुस्थानी शब्द पुष्कळ मिसळले आहेत. आणि अलीकडे इंग्रजीशब्दही मिसळत चालले आहेत. यांवेगळे कितेक निवळ 'देशी' ह्मणून शब्द आहेत, त्यांच्या उगमाचा अद्यापि चांगलासा पत्ता लागला नाहीं.

संस्कृतशब्द.—नदी, राजा, मार्ग, गमन, पर्वत, पात्र इत्यादि सहस्रावधि शब्दांचा मराठींत भरणा आहे.

माहाराष्ट्रींतून आलेले शब्द.—सं० हस्त; माहा० हत्थ; म० हात.—सं० पर्ण; मा० पण्ण; म० पान.—सं० स्तंभ, मा० खंभो, म० खांब.—सं० विद्युत्; मा० विज्जुअ, म० वीज. इ०.

देशीशब्द.—डोळा, बोट, धोंडा, रेडा, डोंगर, इ०.

आरबीशब्द.—अक्कल, इलाज, जाहीर, इ०.

फारसीशब्द.—उमेद, दरबार, दर्या, इ०.

हिंदुस्थानीशब्द.—कामगार, असवार, मतवाला, इ०.

इंग्रजीशब्द.—बुक, टेबल, कंपनी, स्टेशन, पेनसिल, स्लेट, इत्यादि.

या सर्व शब्दांचे तीन भेद. सिद्ध, साधित, आणि सामासिक.

जे अगदीं साधे शब्द ते सिद्ध. जसें,—घर, पैसा, भाजी, कृपा, इ०.

जे शब्द दुसऱ्या शब्दापासून उत्पन्न होतात, ते **साधित**. साधित शब्दांचे भेद दोन, **कृदंत** आणि **तद्धित**. जे शब्द धातुशब्दापासून उत्पन्न होतात, ते **कृदंत**; आणि जे शब्द नामें विशेषणें किंवा अव्ययें यांपासून उत्पन्न होतात, ते **तद्धित**.

| धातु. | प्रत्यय. | कृदंतें. | शब्द. | प्रत्यय. | तद्धितें. |
|---|---|---|---|---|---|
| दळ | ण | दळण | राग | ईट | रागीट |
| लिही | णावळ | लिहिणावळ | असा | ला | असला |
| खेळ | कर | खेळकर | पांच | वा | पांचवा |
| नेम | णूक | नेमणूक | येथें | चा | येथचा |
| कर | णी | करणी इ०. | पाटील | की | पाटिलकी इ०. |

दोन किंवा अधिक शब्द एकत्र मिळून जो एक शब्द होतो, तो **सामासिक**. जसें राजवाडा, हरिदास, इ०.

अशा रीतीनें शब्द उत्पन्न होणें याला समास ह्मणतात.

समासाचे प्रकार सात.—अव्ययीभाव, तत्पुरुष, कर्मधारय, बहुव्रीहि, द्वंद्व, मध्यमपदलोपी, आणि द्विगु.

ज्या समासानें जोडलेले शब्द अव्ययाप्रमाणें योजले जातात, तो अव्ययीभाव. जसें—बरोबर, हरघडी, दररोज, इ०.

ज्या समासामध्यें पूर्वशब्दाची विभक्ति जाते, आणि उत्तरशब्द प्रमुख होतो, तो तत्पुरुष.—जसें, द्वितीयातत्पुरुष—परपीडा; तृतीयातत्पुरुष—द्रव्यसाध्य; चतुर्थीतत्पुरुष—पोळपाट; पंचमीतत्पुरुष—चोरभय; षष्ठीतत्पुरुष—राजवाडा; सप्तमीतत्पुरुष—गृहप्रवेश; इ०. नव्हे जो ब्राह्मण तो 'अब्राह्मण' याला नञतत्पुरुष ह्मणतात.

विशेषण आणि विशेष्य यांचा जो समास तो कर्मधारय. जसें—नीलकमल, शुक्लपक्ष, इ०. (वस्तुतः हा प्रथमातत्पुरुषच आहे.)

योजलेल्या शब्दांहून भिन्न अर्थाकडे ज्या समासाचें लक्ष्य असतें, तो बहुव्रीहि. जसें,—चतुर्भुज (ह्म०विष्णु), मृगनयना (ह्म०सुंदर स्त्री), इ०.

अनेक शब्दांचा समुच्चय दाखविणारा जो समास, तो द्वंद्व. जसें,—रामलक्ष्मण, कुणबीमाळी, इ०.

दोन शब्दांचा समास होऊन त्यामध्यें पुष्कळ लांबट अर्थाचा संग्रह होतो, तेव्हां तो मध्यमपद-लोपी. जसें.—साखर केशर इत्यादि कित्येक पदार्थ घालून कांहीं विशेष रीतीनें केलेला जो भात तो साखरभात; दहिंवडी, इ०.

ज्यामध्यें पूर्वशब्द संख्यावाचक असून, सर्व-शब्द एकवचनीं असतो, तो द्विगु. जसें.—पंचपाळें, तिधारें, इ०.

## संधिविचार.

निरनिराळे वर्ण एकत्र उच्चारतांना जीभ अड-खळूं नये ह्मणून, त्यांच्या स्थानीं जो सोपा उच्चार येतो, त्याचें नांव संधि, अर्थात् सांधा.

संस्कृत शब्दांमध्यें संधि पुष्कळ येतात. पण त्यांतून कामापुर्ते एथें सांगतों.

१. अ इ उ ऋ, यांतून कोणताही स्वर ऱ्हस्व किंवा दीर्घ कसाही असून, त्यापुढें तोच स्वर, ऱ्हस्व दीर्घ कसाही आला, तर ते दोन्ही स्वर जातात, आणि दोहोंच्या स्थानीं मिळून त्यांचा दीर्घ स्वर येतो. उदा०—

| | |
|---|---|
| दैव-अधीन—दैवाधीन | गिरि-ईश—गिरीश |
| फल-आशा—फलाशा | साधु-उक्ति—साधूक्ति |
| गंगा-अर्पण—गंगार्पण | चमू-उत्साह—चमूत्साह |
| कृपा-आरंभ—कृपारंभ | पितृ-ऋण—पितॄण |

२. अ अथवा आ आधीं असला, आणि त्यापुढें कोणताही भिन्न स्वर आला, तर ते दोन्ही जातात, आणि दोहोंच्या स्थानीं मिळून एक वेगळाच संधि येतो; पण तो सर्वदा पुढील स्वराच्याच धोरणानें येतो. तो असा,—पुढील वर्ण इ किंवा ई असल्यास ए; उ-ऊ असल्यास ओ; ऋ-ॠ असल्यास अर्; ऌ असल्यास अल्; ए-ऐ असल्यास ऐ; ओ-औ असल्यास औ. उदा०—

| | | | |
|---|---|---|---|
| यांना 'गुणादेश' म्हणतात. | देव-इच्छा—देवेच्छा | गुण-एकत्व—गुणैकत्व | यांना 'वृद्ध्यादेश' म्हणतात. |
| | रमा-ईश—रमेश | सुख-ऐश्वर्य—सुखैश्वर्य | |
| | सूर्य-उदय—सूर्योदय | इच्छा-ऐक्य—इच्छैक्य | |
| | विद्या-उद्देश—विद्योद्देश | वन-ओषधि—वनौषधि | |
| | देव-ऋषि—देवर्षि | देव-औदार्य—देवौदार्य | |
| | तव-ऌकार—तवल्कार | कृपा-औदार्य—कृपौदार्य | |

३. या येत्या प्रकारामध्यें प्रथमचा स्वर मात्र जातो, आणि त्याच्या स्थानीं वेगळाच वर्ण येतो; पुढील स्वरामध्यें कांहींच भेद पडत नाहीं, हें नीट ध्यानांत ठेवावें. अ—आ सोडून दुसरा कोणताही स्वर आधीं असला, आणि पुढें कोणताही भिन्न-स्वर आला, तर प्रथमस्वराच्या स्थानीं वेगळाच वर्ण येतो. तो असा—इ ई यांच्या स्थानीं य्; उ ऊ यांच्या स्थानीं व्; ऋ ॠ यांच्या स्थानीं र्; ऌ यांच्या स्थानीं ल्; ओ यांच्या स्थानीं अव्. उदा०—

| | |
|---|---|
| रवि-उदय—रव्य्-उदय—रव्युदय<br>नदी-ओघ—नद्य्-ओघ—नद्योघ<br>गुरु-आज्ञा—गुर्व्-आज्ञा—गुर्वाज्ञा<br>चमू-ईश—चम्व्-ईश—चम्वीश<br>पितृ-आज्ञा-पित्र्-आज्ञा-पित्राज्ञा<br>ऌ-अनुबंध—ल्-अनुबंध—लनुबंध<br>गो-ईश—गव्-ईश—गवीश इत्यादि. | याला 'यणादेश' ह्मणतात. |

४. न् यापुढें चवर्ग, टवर्ग, किंवा ल् आला, तर न् जाऊन त्याच्या स्थानीं पुढील वर्णासारखाच, पण अल्पप्राण वर्ण येतो.

क् हा अल्पप्राण, ख् हा महाप्राण; ग् इ् हे अल्पप्राण, घ् हा महाप्राण; असें प्रत्येक वर्गांत जाणावें. श् ष् स् हे महाप्राण. य् र् ल् व् हे अल्पप्राण.

| | |
|---|---|
| सत्-चरित्र—सच्चरित्र | तत्-टीका—तट्टीका |
| तत्-छाया—तच्छाया | तत्-डमरु—तड्डमरु |
| तत्-जाया—तज्जाया | तत्-ढक्का—तड्ढक्का |
| बृहत्-झंकार—बृहज्झंकार | सत्-लीला—सल्लीला इ०. |

५. त् यापुढें श आला, तर दोन्ही व्यंजनें जातात, आणि दोहोंच्या स्थानीं मिळून च्छ् हें संयुक्त व्यंजन येतें. जसें, सत्—शास्त्र—सच्छास्त्र; तत्—शब्द—तच्छब्द; इ०.

६. क् ट् त् प् यांतून कोणत्याही व्यंजनापुढें कोणत्याही वर्गांतील पांचवें ह्मणजे अनुनासिक व्यंजन आलें, तर क् ट् त् प् यांच्याही स्थानीं त्या त्या वर्गांतील पांचवें व्यंजन येतें. जसें.—

| | |
|---|---|
| पृथक्-नाम-पृथङ्नाम | तत्-नयन—तन्नयन |
| वाक्-मन—वाङ्मन | सत्-मान—सन्मान |
| षट्-मुख—षण्मुख | अप्-मय— अम्मय |
| प्रावृट्-नदी—प्रावृण्नदी | ककुप्-नाग—ककुम्नाग इ०. |

७. क् ट् त् प् यांपुढें कोणत्याही वर्गांतील तिसरें किंवा चौथें व्यंजन, किंवा य् र् ल् व् ह, किंवा कोणताही स्वर आला, तर प्रथम वर्णाच्या स्थानीं त्याचा तिसरा वर्ण येतो. ह्मणजे क्च्या स्थानीं ग्; ट्च्या स्थानीं ड्; त्च्या स्थानीं द्; आणि प्च्या स्थानीं ब्; हीं व्यंजनें येतात. उदा०—

| | |
|---|---|
| वाक्-ईश—वागीश | तत्-आशा—तदाशा. |
| वाक्-दान—वाग्दान | चित्-गुण—चिद्गुण. |
| प्रावृट्- जल—प्रावृड्जल | अप्-द—अब्द. |
| षट्-गुण—षड्गुण. | सुप्-अंत—सुबंत. इ०. |

८. वर्गांतील पहिल्या चार व्यंजनांतून कोणत्याही व्यंजनापुढें ह् आला, तर तीं दोन्ही व्यंजनें जाऊन, त्यांच्या स्थानीं त्याच वर्गांतील तिसरें आणि चौथें हीं व्यंजनें येतात; अथवा मागील नियमाप्रमाणें कार्य होतें. जसें—

वाक्-हसित—वाग्घसित— किंवा वाग्हसित.

षट्-होतृ—षड्ढोतृ— किंवा षड्होतृ.

सत्-हरि—सद्धरि— किंवा सद्हरि.

अप्-हास—अब्भास— किंवा अब्हास इ०.

प्राय: 'वाग्घसित' इत्यादि प्रकारचींच रूपें येतात. 'वाग्हासित' इत्यादि क्वचित्.

---

## व्याकरण करण्याची रीति.

### मुलांनीं विद्याभ्यासाकडे चित्त ठेवावें.

मुलांनीं—हें 'मूल' या अकारांत नपुंसकलिंगी सामान्यनामाच्या तृतीयेचें अनेकवचन. हा 'ठेवावें' या क्रियापदाचा कर्ता.

विद्याभ्यासा—हें 'विद्याभ्यास' या अकारांत पुल्लिंगी सामान्यनामाचें एकवचनीं सामान्यरूप. "कडे' या अव्ययाच्या योगानें. 'विद्याभ्यास' हा षष्ठीतत्पुरुष समास.

कडे—हें प्रत्ययार्थक अव्यय. 'विद्याभ्यासाकडे' या सर्व पदाचा अर्थ, 'ठेवावें' याचें अधिकरण.

चित्त—हें 'चित्त' या अकारांत नपुंसकलिंगी सामान्यनामाच्या प्रथमेचें एकवचन. हें 'ठेवावें' या क्रियापदाचें कर्म.

ठेवावें—हें 'ठेव' या सकर्मक धातूचें सातव्या आख्यातीं अन्यपुरुषीं नपुंसकलिंगीं एकवचन. याचा अर्थ धर्म, आणि यांत प्राधान्य 'चित्त' या कर्माचें.

परमेश्वर सर्वांचा त्राता आहे.

परमेश्वर—हें 'परमेश्वर' या अकारांत पुल्लिंगी विशेषनामाच्या प्रथमेचें एकवचन. हा 'आहे' या क्रियापदाचा कर्ता.

सर्वांचा—हें 'सर्व' या नामार्थक (ह्मणजे नामाप्रमाणें योजलेल्या) पुल्लिंगी संख्याविशेषणाच्या षष्ठीचें अनेकवचन. याचा संबंध 'त्राता' याकडे.

त्राता—हें 'त्राता' या आकारांत पुल्लिंगी सामान्यनामाच्या प्रथमेचें एकवचन. याचा अर्थ विधान.

आहे—हें 'आहे' किंवा 'अस' या अकर्मकधातूचें प्रथमं आख्यातीं अन्य पुरुषीं पुल्लिंगीं एकवचन. याचा अर्थ वर्तमानकाळ, आणि यांत प्राधान्य 'परमेश्वर' या कर्त्याचें.

## त्या मुलाला बोलाव.

त्या—हें 'तो' या पुल्लिंगी सर्वनामाचें लुप्त-द्वितीयेचें एकवचनी सामान्यरूप. याचें विशेष्य 'मुलाला'.

मुलाला—हें 'मूल' या अकारांत पुल्लिंगी सामान्यनामाच्या द्वितीयेचें एकवचन. हें 'बोलाव' या क्रियापदाचें कर्म.

बोलाव—हें 'बोलाव' या सकर्मक धातूचें साहाव्या आख्यातीं मध्यमपुरुषीं सामान्यलिंगी एकवचन. याचा अर्थ आज्ञा; आणि यांत प्राधान्य 'तूं' या अध्याहृत कर्त्याचें.

# शुद्धपत्र.

| | ओळ. | अशुद्ध. | शुद्ध. |
|---|---|---|---|
| | ७ | मंव्य | मध्यें |
| १ | ६ | ( तं ) | ( तूं ) |
| ” | १८ | नव्हतें | आलें नाहीं. |
| ७७ | १३ | ? | ना ? |
| ” | १९ | कर्मप्र० | भावप्रधान. |
| ७८ | १७ | साग | सांग |
| ७९ | २ | मूखाचें | मूर्खांचें |
| ” | १७ | लागला | लागलेला |

पृष्ठ ३६,३७,३९, एथें ‘चाव, धातूच्या संबधानें अधिक सांगायाचें--

‘चाव’धातूपासून, ‘त्यानें आपली जीभ चावली’ (कर्मप्र०):‘तो कुत्रा हाडकें चावीत असतो;’ ‘ती मुलगी तुझें बोट चावील संभाळ;’ इत्यादि प्रकारें इतर सकर्मक धातूंप्रमाणेंही रूपें होतात. थोडासा अर्थभेद आहे, तो सहज लक्षांत येईल.

पृष्ठ ९७ ओळ ४ एथें अधिक घालायाचें—

परंतु ‘ ह्मण ’ धातूच्या संबंधानें, “ त्या प्रवाहास ‘ नदी ’ ह्मणावें, अथवा ‘ नदी ’ असें ह्मणावें, ” असे भावप्रधान प्रयोग येतात, ते शुद्ध मानणें प्राप्त आहे.